# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.१ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## 'मंदिर असो वा दर्गा, बेकायदेशीर बांधकाम पाडणार', सर्वोच्च न्यायालयाची स्पष्ट भूमिका'रस्त्यात मंदिर, दर्गा, गुरुद्वारा, चर्च असूच शकत नाही...'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**

सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी (१ ऑक्टोबर २०२४) बुलडोझर कारवाई प्रकरणाची सुनावणी झाली. या दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने अतिक्रमणाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. सार्वजनिक सुरक्षा सर्वोपरि आहे. रस्ते, जलकुंभ किंवा रेल्वे रुळांवर अतिक्रमण करणारी कोणतीही धार्मिक इमारत हटविली पाहिजे. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे, बुलडोझर कारवाई



आणि अतिक्रमणविरोधी मोहिमेचे निर्देश सर्व धर्मातील नागरिकांसाठी असतील, असे न्यायालयाने म्हटले.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्या युक्तिवादावर न्यायमूर्ती गवई म्हणाले की, आम्ही धर्मनिरपेक्ष व्यवस्थेत आहोत. बेकायदा बांधकाम हिंदूंचे असो वा मुस्लिमांचे...त्यावर कारवाई झालीच पाहिजे. मी मुंबईत न्यायाधीश असताना फूटपाथवरुन बेकायदा बांधकामे हटवण्याचे आदेश दिले होते. परंतु गुन्ह्यात आरोपी असणे, हा त्याचे घर पाडण्यासाठीचा आधार असू शकत नाही, हे समजून घेतले पाहिजे, असेही न्यायाधीशांनी स्पष्ट केले.

बुलडोझरवरील बंदी कायम ठेवत सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, ते अवमान करणाऱ्यांकडून नुकसानभरपाई वसूल केली जाईल. कायद्यानुसार कारवाई न केल्यास पीडितांची मालमत्ता परत करण्यात येईल आणि त्याची भरपाईही दोषी अधिकाऱ्यांकडून वसूल केली जाईल. आपण धर्मनिरपेक्ष देश आहोत, आपची मार्गदर्शक तत्त्वे देशातील प्रत्येकासाठी लागू असतील. मंदिर, दर्गा किंवा गुरुद्वारा असो, ते काढून टाकले जाईल. कारवाईपूर्वी त्या कुटुंबाला अन्यत्र राहण्यासाठी १५ दिवसांचा अवधी द्यावा. पण, रस्ते, पदपथ इत्यादींवर होणाऱ्या बांधकामांना आम्ही कोणतेही संरक्षण देणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

## 'जज्बा'! रोहित अँण्ड कंपनीनं अशक्य ते शक्य करून दाखवलं; कानपूरमध्ये टीम इंडियाचा ऐतिहासिक विजय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१कानपूर**

भारतीय संघाने कानपूर येथील ग्रीन पार्कच्या मैदानात रंगलेल्या कसोटी सामन्यात ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. पावसाच्या व्यत्ययामुळे अडीच दिवसाहून अधिक दिवसांचा खेळ पाण्यात गेल्यावर या सामन्याचा निकाल लागेल, याची शक्यता अगदी धूसर झाली होती. पण रोहित अँण्ड कंपनीनं धमक असेल तर अशक्य ते शक्य करून दाखवता येते, हे दाखवून देत कानपूर कसोटी जिंकली आहे. कानपूर कसोटी सामन्यातील पाचव्या दिवशी भारतीय संघासमोर फक्त ९५ धावांचे आव्हान होते. ते टीम इंडियाने अगदी सहज पार करत मालिका २-० अशी खिशात घातली. टीम इंडियाने चौथ्या दिवशी पहिल्या डावात स्ट्राइक रेटनं धावा काढण्याचा जो डाव खेळला तो मॅचमधील टर्निंग पाइंट ठरला. घरच्या मैदानावर भारतीय संघाने सलग १८ वी कसोटी मालिका जिंकली आहे.

बांगलादेशच्या संघाने ठेवलेल्या अल्पधावसंख्येचा पाठलाग करताना रोहित शर्मा आणि यशस्वी जयस्वाल जोडीनं भारताच्या डावाला सुरुवात केली. भारताच्या धावफलकावर फक्त १८ धावा लागल्या असताना मोठा फटका खेळण्याच्या नादात रोहित शर्मा मोठा फटका मारण्याच्या नादात




झेल बाद झाला. त्याने एका चौकारासह ७ चेंडूत ८ धावा केल्या. त्याची जागा घेण्यासाठी आलेल्या शुबमन गिलही फार काळ टिकला नाही. मेहदी हसन मिराझ याने त्याला ६ धावांवर चालते केले. दुसऱ्या बाजूला युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल याने आपल्या कामगिरीतील सातत्य राखत अर्धशतकाला गवसणी घातली. सलग दुसऱ्या डावात त्याच्या भात्यातून अर्धशतक आले. भारतीय संघाला विजयासाठी फक्त ३ धावांची गरज असताना मोठा फटका मारून मॅच संपवण्याच्या नादात तो बाद झाला. त्याची जागा घेण्यासाठी मैदानात उतरलेल्या पंतनं खणखणीत चौकार मारून संघाला विजय मिळवून दिला. दुसऱ्या बाजूला विराट कोहली ३७ चेंडूत २९ धावा करून नाबाद राहिला.

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य; राहुल गांधींना कोर्टाने काढले समन्स

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नाशिक**

विरोधी पक्षनेते तथा खासदार राहुल गांधी यांनी जाहिर सभेत केलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याविरोधी वक्तव्याबाबत निर्भय फाउण्डेशनचे अध्यक्ष देवेंद्र भुतडा यांनी २०२२साली न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी होऊन जिल्हा न्यायालयानेराहुल गांधी यांना अतिरिक्त मुख्य सत्र न्यायाधीश दिपाली कडुसकर यांच्या न्यायालयाकडून समन्स बजावण्यात आले आहे.

२०२२साली हिंगोलीमध्ये झालेल्या जाहिर सभेत राहुल गांधी यांनी सावरकर यांच्याविरूद्ध आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. या वक्तव्यावर आक्षेप घेत निर्भया फाउण्डेशनने न्यायालयात दाद मागितली होती. यावेळी त्यांच्याकडून न्यायालयात सावरकर व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यातील संबंधांविषयीचे दाखले सादर करण्यात आले. ज्याप्रकारे आक्षेपार्ह वक्तव्य गांधी यांनी केले होते, त्या वक्तव्यामध्ये बीजेपी पक्षाचा उल्लेख होता. सावरकर



असताना हा पक्षदेखील नव्हता, असेही न्यायालयात सांगण्यात आल्याची माहिती निर्भय फाउण्डेशनकडून बाजू मांडणारे ड.मनोज पिंगळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. न्यायालयाने याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

सादर करण्यात आलेली माहिती, पुराव्यांअधारे न्यायाधीश कडुसकर यांनी सीआरपीसी कलम २०४ व भादंवि कलम ४९९ व ५०४ नुसार समन्स बजावले आहे. देशभक्त व्यक्तीविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य हे मानहानीकारक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते, असे न्यायालयाने समन्सच्या आदेशात म्हटले आहे.

## ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ५६ वसतीगृह सज्ज; ५ ऑक्टोबरपर्यंत उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नागपूर**

राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरू करण्याची मागणी आमदारांनी अधवेशनात केली होती. त्यानुसार ३६ जिल्ह्यांमध्ये ७२ वसतिगृह सुरू करण्याची घोषणा सरकारने हिवाळी अधिवेशनात केली होती. यातील २८ जिल्ह्यात ५६ वसतीगृह सज्ज झाले असून ५ ऑक्टोबरपर्यंत या वसतीगृहांचे उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली. मंगळवारी सामाजिक न्याय भवन येथे आयोजित बैठकीत ओबीसी विद्यार्थ्यांच्या विदर्भातील वसतीगृहांचा अतुल सावे यांनी आढावा घेतला.

५ ते ६ ऑक्टोबरला या सर्व वसतीगृहांचे उद्घाटन होणार असल्याने तयारीचा आढावा घेण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यातील वसतीगृहात १०० विद्यार्थी व १०० विद्यार्थीनींसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक असलेल्या सुविधा, फर्निचर उपलब्ध करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या. नागपूर येथील वसतीगृह अपूर्ण होते. आता सर्व वसतीगृह अपग्रेड करण्यात आल्याची माहिती अतुल सावे यांनी दिली.

वसतीगृहासांठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करण्याची जबाबदारी एसटीओ कंपनीकडे देण्यात आली आहे. विद्यार्थीनींच्या वसतीगृहात महिला कर्मचारी राहतील. येथे स्वच्छता ठेवण्यासोबतच सुरक्षा व्यवस्था चोख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समाज शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना बड्या शहरांमध्ये राहावे लागते. सरकारी सुविधा नसल्याने हे विद्यार्थी शिक्षणापासून दुरावतात. उच्च शिक्षणापासून अनेकदा वंचित राहतात. या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी ओबीसी संघटनांनी सामाजिक न्याय विभागाप्रमाणे ओबीसींसाठी स्वतंत्र वसतिगृहांसाठी आग्रह धरला. याची दखल घेत हिवाळी अधिवेशनात राज्यातील सर्व जिल्ह्यांत मुला-मुलींसाठी प्रत्येकी शंभर विद्यार्थी क्षमतेचे दोन वसतिगृह सुरू करण्याची घोषणा करण्यात आली होती.

## लाडक्या बहिणींची दिवाळी दणक्यात, रक्षाबंधनला ३०००, आता भाऊबीजेलाही; अजित दादांचा वादा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१बीड**

आगामी निवडणुकांची घोषणा होण्यापूर्वीच राजकीय पक्ष कामाला लागले असून राज्य सरकारच्यावतीने लाडकी बहीण योजनेचे कार्यक्रम राबवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व दोन्ही उपमुख्यमंत्री जनतेमधेय मिसळत आहेत. राज्यातील लाडक्या बहिणींना अभिवचन देत लाडकी बहीण योजना ही केवळ निवडणुकांपूर्ती नसून पुढील ५ वर्षांपर्यंत चालणार असल्याचा विश्वासही देत आहेत. मात्र, त्यासाठी महायुती सरकारला लाडक्या बहिणींनी आशीर्वाद द्यावेत,असे आवाहन या राज्यकर्त्या नेतेमंडळींकडून केले जात आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून राज्यचा दौरा आखला असून सध्या ते मराठवाड्यात आहेत. बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे लाडक्या बहिणींशी संवाद साधताना अजित पवार यांनी पुन्हा एकदा बहिणींना लवकरच ओवाळणी मिळणार असल्याचं सांगितलं.

राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेचे तीन हफ्ते महिलांच्या बँक खात्यात जमा झाले असून आत्तापर्यंत




तब्बल २ कोटींपेक्षा जास्त महिलांना या योजनेच्या माध्यमातून थेट लाभ झाला आहे. त्यामुळे, लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिला अधिक खुश आहेत. तसेच, महिन्याला १५०० रुपये जमा होण्याची वाट पाहतात. राज्य सरकारने ऐन रक्षाबंधन सणाच्या अगोदर महिलांच्या बँक खात्यात लाडकी बहीण योजनेच्या दोन महिन्यांचा एकत्रित हफ्ता ३००० रुपये जमा केला होता. त्यानंतर, सप्टेंबर महिन्यातील १५०० रुपयांचा हफ्तादेखील २९ सप्टेंबर रोजी महिलांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. आता, दिवाळीच्या भाऊबीजलेही महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा होणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

राज्यात ज्या ठिकाणी राष्ट्रवादीचे आमदार आहेत, त्या त्या ठिकाणी मी जनसन्मान यात्रा घेऊन जात आहे. विरोधक टीका करतात, पण आमच्या अंगाला काही भोक पडत नाहीत. ते सत्तेत असताना कोणती योजना आणली?. मात्र, माता माऊलींसाठी आम्ही लाडकी बहीण योजना आणली आहे. तुम्ही तुमच्या हक्काचे पैसे कधीही केव्हाही काढू शकता. आम्ही दिलेल्या योजना पाच वर्षे चालण्यासाठी घड्याळा चिन्हाला तुम्हाला मतदान करावे लागेल. मी बोलतो तसा वागतो, हा अजितदादांचा वाद आहे. रक्षाबंधनला जसे तीन हजार रुपये दिले तसेच भाऊबीजेला देखील माझ्या बहिणीला मी खाली हाताने पाठवणार नाही तिला ओवाळणी देणार म्हणजे देणार हाच माझा वादा आहे, असे म्हणत भाऊबीजेलाही ओवाळणी मिळणार असल्याची घोषणाच माजलगाव येथील सभेतून अजित पवारांनी केली.

## उद्धव ठाकरेंनी आमच्यावर टीका करताना आरसा बघावा, देवेंद्र फडणवीस यांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१नागपूर**

रविवारी नागपूरमधील कळमेश्वर येथे झालेल्या सभेमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपा, देवेंद्र फडणवीस आणि अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली होती. त्यामुळे आता भाजपाकडूनहीउद्धव ठाकरे यांना आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिलं जात आहे. आमच्यावर टीका करताना उद्धव ठाकरे यांनी आरसा बघावा, असं प्रत्युत्तर देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना दिलं आहे.

उद्धव ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माननीय उद्धव ठाकरे यांनी आरसा बघावा. कारण काश्मीरमधील ज्या ३७० कलमामुळे काश्मीर भारतापासून दूर झालं होतं. ते ३७० कलम रद्द करणारे मोदींसोबत अमित शाह आहेत. हिंदू म्हणून आमची जी काही ओळख होती, ती पुसण्याचा जो प्रयत्न झाला होता. ५०० वर्षांनंतर तो प्रयत्न मोडून टाकणारे आमचे नेते आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी टीका करताना एकदा आपला चेहरा आकशात पाहून घ्यावा, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.दरम्यान, काल नागपूरमधील सभेमधून उद्धव ठाकरे यांनी भाजपावर जोरदार टीका केली होती.



उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना राजकारणातून संपवण्याच्या केलेल्या विधानावरूनही उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले की, अमित शाह आम्हाला संपवण्यासाठी येणार आहेत. आम्हाला केवळ जनता संपवू शकते. जनतेनं सांगितलं की, उद्धव ठाकरे घरी बस, तर मी घरी बसेन. मात्र हे मला दिल्लीवरून घरी बसायला सांगत असतील तर जनताच त्यांना घरी बसवेल. हा लढा माझा नाही किंवा शरद पवार यांचा नाही तर आपणा सर्वांचा आहे, असेही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले होते. तसेच संघाने पोसलेल्या रोपट्याला दाढीवाला डिंक्या आणि गुलाबी अळी लागलीय, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी भाजपा, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना टोला लगावला होता.

## 'घड्याळ' चिन्हाबाबत आजही सुनावणी झालीच नाही; सुप्रीम कोर्टाने दिली पुढची तारीख

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**

राज्यात विधानसभा निवडणुकांची घोषणा काहीच दिवसात होऊ शकते. सर्व पक्षांनी यासाठी तयारी सुरू केली आहे. जागावाटपाच्याही चर्चा सुरू आहेत. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाला दिलेल्या चिन्ह आणि नावाच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात शरद पवार गटाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली. तेव्हापासून खटला सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. आज चिन्हाबाबतीत सुनावणी होणार होती. पण आता पुन्हा ही सुनावणी



पुढे ढकलण्यात आली आहे. आता सुप्रीम कोर्टात ही सुनावणी १५ ऑक्टोंबर रोजी होणार आहे.

राष्ट्रवादीतील आमदार अपात्र आणि घड्याळ चिन्हाबाबतची सुनावणी सुप्रीम कोर्टाने पुढे ढकलली आहे. ही सुनावणी १५ ऑक्टोंबरपर्यंत पुढे ढकलली आहे.या सुनावणीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला घड्याळ चिन्ह कायम राहणार की पुन्हा नवीन चिन्ह मिळणार हे स्पष्ट होणार आहे.

जून महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत सुप्रीम कोर्टाने काही अटींवर घड्याळ चिन्ह वापरण्यास परवानगी दिली होती. दरम्यान, आता सुप्रीम कोर्ट घड्याळ चिन्हाबाबत कोणता निर्णय देत हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. राज्यात काही दिवसातच विधानसभेच्या निवडणुका जाहीर होऊ शकतात.

## संपादकीय ......

# अभ्यासक्रमांतील बदल तर्कसंगत

गेल्या काही वर्षांपासून पालकांमध्ये केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाचे आकर्षण वाढताना दिसत आहे. त्यामुळे देशभर या शाळांची आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. देशातील एकूण विद्यार्थी संख्या लक्षात घेता, हे प्रमाण फार नाही. या शाळांचे अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावरील असल्याने देशपातळीवरील विविध स्पर्धा परीक्षाही याच अभ्यासक्रमांवर आधारलेल्या असतात. त्यामुळेच आता केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाला संलग्न असलेल्या शाळांच्या अभ्यासक्रमांच्या धर्तीवर राज्य मंडळाच्या शाळांचा अभ्यासक्रम तयार करण्याची भूमिका पुढे आली आहे.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये चमकदार कामगिरी करावी यासाठी केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाला संलग्न असलेल्या शाळांच्या अभ्यासक्रमांच्या धर्तीवर राज्य मंडळाच्या शाळांचा अभ्यासक्रम तयार करून अंमलबजावणी करण्याची भूमिका पुढे आली आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन अभ्यासक्रमांचा विचार केला जात असतो. शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय आहे. त्यामुळे राज्य आणि केंद्र सरकार शिक्षणविषयक धोरण घेऊ शकते. गेली काही वर्षे सर्वच क्षेत्रांतल्या केंद्रीकरणाच्या विरोधात आवाज उठविला जात आहे. अशा वेळी आपण स्वत:हून केंद्रीकरणाच्या दिशेने जात असल्याचा हा पुरावा म्हणायला हवा. शाळांचे अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावरील असल्याने देशपातळीवरील विविध स्पर्धा परीक्षाही याच अभ्यासक्रमांवर आधारलेल्या असतात. त्यामुळे या परीक्षांमध्ये संबंधित विद्यार्थी यशस्वी होतात हे खरे आहे. त्यामुळे भविष्याच्या दृष्टीने ज्यांना तो मार्ग निवडायचा आहे, त्या विद्यार्थ्यांचे पालक आरंभापासूनच केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या शाळांची निवड करतात. त्या दृष्टीने राज्य सरकारचा निर्णय निश्चितच तर्कसंगत आहे; पण केवळ स्पर्धा परीक्षा हे कोणत्याही शिक्षणाचे उद्दिष्ट असू शकत नाही. त्यापलीकडे अनेक उद्देशांसाठी विद्यार्थी शिक्षण घेत असतात. त्या विद्यार्थ्यांचे काय, असा प्रश्न उरतोच. शेवटी शिक्षण म्हणजे केवळ स्पर्धा परीक्षा नाही. अभ्यासक्रम हा शेवटी उत्तम नागरिक, समाज व राष्ट्रनिर्मितीसाठी आहे. त्या दृष्टीने विचार करण्याची गरज अलीकडच्या घटना पाहता अधोरेखित होऊ लागली आहे. त्यामुळे समग्र विकासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठीचा विचार केंद्रस्थानी येण्याची गरज आहे.

राज्य सरकारने घेतलेली भूमिका स्पर्धा परीक्षा आणि शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या वर्गांसाठी केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या धर्तीवरील अभ्यासक्रम राबवण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे. हा अभ्यासक्रम राबवण्यामागे जी कारणे आहेत, त्यात विविध स्पर्धा परीक्षांमध्ये आपले विद्यार्थी मागे पडताहेत, हे एक कारण सांगितले जात आहे. अलीकडील काळात देशात विशिष्ट प्रकारच्या अभ्यासक्रमांसाठी केंद्रीय स्तरावरून प्रवेश परीक्षा घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. त्यात अभियांत्रिकी, वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय प्रवेश परीक्षा घेण्यात येताहेत. त्यामुळे राज्य आणि केंद्रीय अभ्यासक्रमांत समानता असावी, असा विचार पुढ येत आहे. राष्ट्रीय स्तरावरून घेण्यात येणार्या परीक्षांचे मूल्यमापन लक्षात घेता अधिकाधिक प्रश्न हे केंद्रीय स्तरावरील अभ्यासक्रमातील घटकांशी निगडित असतात. राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना त्या परीक्षांना सामोरे जाताना काहीसे कठीण जाते. त्यातून राज्याचा अभ्यासक्रम हा केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळासारखा असला पाहिजे, अशी भूमिका घेणारा एक समूह आहे. त्यातून सर्व अभ्यासक्रम समान असायला हवा, अशी मागणीदेखील पुढे येऊ लागली आहे. केवळ केंद्रीय प्रवेश परीक्षांसाठी अशा प्रकारची भूमिका समोर येत असल्याने राज्य मंडळाचा अभ्यासक्रम हा टाकाऊ आहे का, असाही प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला. राज्यातील शाळा केंद्रीय मंडळाच्या अभ्यासक्रमाशी नाते सांगणार्या असायला हरकत नाही; पण त्यातील खरी मेख ही अभ्यासक्रमाची नसून, शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा, शिक्षणातील अव्यवस्था दूर करण्याचा, शाळांमधील सुविधा वाढविण्याचा मुद्दा महत्त्वाचा आहे. शिक्षण सेवेतील संस्थांची स्वायत्तता टिकविण्याचा आहे.

# चिकू लागवड करण्याचा विचार आहे? कशी कराल लागवड वाचा सविस्तर

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू ह्या राज्यांत चिकूची लागवड मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. चिकू हे अतिशय काटक पीक असून महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या जमिनींत येऊ शकते.

चिकू या पिकामध्ये बहार दरवर्षी हमखास येतो. इतर फळझाडांच्या तुलनेत चिकूवर रोग आणि किडींचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात आढळतो. चिकू हे पीक कमी पाण्यावरही जगू शकते.




जमीन व हवामान

मध्यम प्रतीच्या, उत्तम व बारमाही पाण्याची सोय असलेल्या जमिनीत चिकू लागवड करता येते. भारी जमिनीत चर खोदून पाण्याचा निचरा करणे गरजेचे आहे. दमट व कोरड्या या दोन्ही हवामानात चिकूची वाढ चांगली होते.

**लागवड**

लागवडीपासून तीन वर्षे कलमावरील फुले खुडून काढावीत. कलमांची पूर्ण वाढ होण्यास आठ ते दहा वर्षांचा कालावधी लागतो. पहिल्या सहा वर्षाच्या कालावधीत चिकूच्या लागवडीमध्ये आंतरपिके म्हणून भाजीपाला, अल्पायुषी फळझाडे, फुलझाडे, द्विदल धान्य घेता येतात.

**चिकूच्या सुधारित जाती**

**१) कालीपत्ती**

या जातीच्या झाडाची पाने गर्द हिरव्या रंगाची व फळे गोल अंडाकृती असतात. फळाची साल पातळ असून गर गोड असतो. फळे भरपूर लागतात. या जातीच्या फळांना चांगला दरही मिळतो.

२) क्रिकेटबॉल

या जातीपासून मोठी गोलाकार फळे मिळतात. गर कणीदार असतो. मात्र गोडी कमी असून, फळे चवीला कमी असतात. फळे भरपूर लागतात.

**३) छत्री** – या झाडाच्या फांद्यांची ठेवण छत्रीसारखी असते. पाने फिकट हिरव्या रंगाची असतात. फळाचा आकार कालीपत्तीच्या फळांप्रमाणे असतो. परंतु गोडी असते.

**खत व्यवस्थापन**– पहिल्या वर्षी प्रत्येक कलमास एक घमेले शेणखत, ३०० ग्रॅम युरिया, ९०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट आणि ३०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश दोन हप्त्यात सम प्रमाणात विभागून देणे आवश्यक आहे.

– पहिला हप्ता ऑगस्टमध्ये आणि दुसरा हप्ता जानेवारीमध्ये द्यावा.

– दुसऱ्या वर्षी पहिल्या वर्षाच्या दुप्पट, तिसऱ्या वर्षी तिप्पट याप्रमाणे खताचे प्रमाण २० वर्षापर्यंत वाढवित न्यावे.

– त्यानंतर दरवर्षी २० घमेले शेणखत, सहा किलो युरिया, १८ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व सहा किलो म्युरेट ऑफ पोटॅश ही खते चरातून बांगडी पद्धतीने प्रति झाडास द्यावीत.

**पाणी व्यवस्थापन**

हिवाळ्यात आठ व उन्हाळ्यात पाच दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पाणी देण्यासाठी झाडाच्या विस्ताराच्या आकाराचे गोल आळे करावे. झाडाला सतत पाणी मिळेले, परंतु पाणी साठून राहणार नाही, अशी योजना करावी. तुषार किंवा ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करावा.

**छाटणी**– जुन्या व घनदाट चिकूच्या बागेमधून अधिक उत्पन्नासाठी ऑक्टोबरमध्ये मधल्या मुख्य फांदीची छाटणी व विरळणी करावी.

**कीड नियंत्रण उपाय**

कीडींचे नियंत्रणासाठी वेळीच उपाययोजना गरजेची आहे. बागेची स्वच्छता राखून झाडांची योग्य छाटणी करून बागेत पुरेसा सूर्यप्रकाश येईल असे पाहावे. बागेत निळ्या रंगाचा प्रकाश सापळा लावावा. कीडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे पालापाचोळा गोळा करून जाळून नष्ट करावा. एक महिन्याच्या फरकाने कीटकनाशके आलटून पालटून फवारण्या कराव्यात. फवारणीपूर्वी फळे काढून घ्यावीत.

# महापालिका क्षेत्रात अकरावी प्रवेशाच्या ६२२१ जागा रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती**– महापालिका क्षेत्रामधील कनिष्ठ महाविद्यालयात केंद्रीय पद्धतीने ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत आहे. प्रवेशासाठी सहावी विशेष तथा अंतिम फेरीनंतरही प्रवेशाच्या ६२२१ जागा रिक्तच आहे.

या रिक्त जागेवर प्रवेशासाठी पुन्हा प्रवेशाच्या तीन फेऱ्या राबविण्यात येत आहेत. १ ऑक्टोबरपासून प्रवेशाची पहिली फेरी सुरू होत आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे अजूनही प्रवेश झालेले नाहीत त्यांना अर्ज करता येणार आहे.महानगर पालिका क्षेत्रातील ६८ कनिष्ठ महाविद्यालय असून अकरावी प्रवेशाच्या एकूण १६ हजार १६० जागा आहेत. या प्रवेशित



जागेसाठी केंद्रीय प्रवेशप्रक्रियेला सुरुवात ५ जूनपासून करण्यात आली होती.

२५ सप्टेंबरपर्यंत प्रवेशाच्या एकूण ६ विशेष फेऱ्या राबविण्यात आल्या; परंतु शहरांतील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेशाला पसंती कमी

असल्याचे दिसून येत आहे. सहा विशेष फेऱ्यांनंतर कला शाखेतील २०३७, वाणिज्य १५१२, विज्ञान ५८०६, तर एमसीव्हीसी अभ्यासक्रमाच्या ५८७ असे एकूण ९ हजार ९३९ विद्यार्थ्यांचेच प्रवेश निश्चित झाले आहेत;

परंतु अजूनही प्रवेशाच्या ६ हजार २२१ जागा रिक्तच असल्याने आता प्रवेशासाठी पुन्हा एकदा तीन फेऱ्या राबविण्यात येणार असल्याची माहिती अकरावी प्रवेश परीक्षा समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली.

# विधानसभा निवडणुकीच्या कामाला सुरुवात

## प्रशासनाकडून प्रशिक्षण, मतदान यंत्राबाबत गावोगावी जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती**



आगामी विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता येत्या ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात लागण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे अवधी प्रशासकीय यंत्रणा निवडणुकीच्या कामाला लागली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशिक्षण कार्यशाळांचा धडाका सुरू आहे. जिल्ह्यातील ८ विधानसभा मतदारसंघांतील गावागावांत महसूल विभागाच्या पथकांच्या माध्यमातून मतदान यंत्रणाचे मतदारांना मतदानाचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यासाठी येत आहे.

जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक शाखेचे उपजिल्हाधिकारी शिवाजीशिंदे यांच्या नेतृत्वात निवडणूक विभागाची प्रशासकीय यंत्रणा विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक तयारी करत आहेत. प्राप्त माहितीनुसार सध्या निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा विधानसभा व , जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यांचे

### आवश्यक तयारी सुरू

विधानसभा निवडणूक निष्पक्ष पद्धतीने पार पाडण्याच्यादृष्टीने आवश्यक तयारी केली जात आहे. प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, मतदानापासून कुणीही वंचित राहणार नाही, याअनुषंगाने नियोजन केले जात केले जात असल्याची माहिती निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

प्रशिक्षण सोमवारी येथील नियोजन – भवनात पार पडले. यामध्ये १०८ जणांना – प्रशिक्षण सहभाग घेतला. १ ऑक्टोबर – रोजी महसूल आणि पोलिस – विभागातील क्षेत्रीय अधिकारी यांना – मास्टर ट्रेनर रवींद्र काजळजे हे – निवडणूकीचे अनुषंगाने प्रशिक्षण देणार आहेत. यात सकाळी १०:३० ते दुपारी १२:३० वाजेपर्यंत धामणगाव रेल्वे, बडनेरा, अमरावती आणि तिवसा तर दुपारी १२:३० ते २ वाजेपर्यंत वाजता दरम्यान दर्यापूर, मेळघाट, अचलपूर व मोर्शी या विधानसभा मतदारसंघांतील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण होईल.




# पोटात जंत होण्याची कारणे काय? जाणून घ्या उपाय

**विदर्भ प्रजासत्ताक**


मानवी शरीरात परजीवीच्या रूपात वेगवेगळ्या प्रकारचे जंत किंवा कृमी राहत असतात. वाढीच्या वेगवेगळ्या चक्रासाठी ते मानवी शरीराचा पोषणासाठी वापर करतात. त्याचा आरोग्यावर अपायकारक परिणाम होतो.

पोटात जंत झाल्यानंतर वेगवेगळ्या प्रकारची लक्षणे दिसू लागतात. लहान मुलांनाच हा त्रास होतो, असे बरेच जण समजात. परंतु, मोठ्या माणसांमध्येदेखील हा त्रास बर्याच प्रमाणात दिसून येतो. अत्यंत चिवट आणि बरे होण्यासाठी खूप जास्त कालावधी घेणारा हा त्रास आहे. प्रामुख्याने अस्वच्छतेमुळे हा त्रास दिसून येतो. कृमींच्या जीवनचक्रातील वेगवेगळ्या अवस्थांना ठरावीक कालावधीनंतर रोखणे, हाच यावरील उपचारपद्धतीचा प्रमुख गाभा आहे.

हा त्रास होण्याचे आणखी एक कारण म्हणजे आहाराचे पचन योग्य प्रकारे न होणे. पचन योग्य झाल्यामुळे पचनसंस्थेत मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण होते. या उष्णतेमुळे अन्न पचण्यास आणखी त्रास होतो आणि पोट साफ होत नाही. अशा वेळी शरीरात राहिलेले टाकाऊ अन्न हे आंबण्याच्या अवस्थेत जाते आणि त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या कृमी निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण होते.कृमींचे प्रमुख दोन प्रकार सांगितले जातात. एक आहे सहज कृमी म्हणजे नॉन पॅथोजनीक बॅक्टेरिया. हे कृमी शरीरात निरनिराळ्या क्रिया घडवून आणण्यासाठी सहायक म्हणून काम करतात. पण, पॅथोजनीक बॅक्टेरिया हे शरीरात विविध प्रकारच्या त्रासांची लक्षणे निर्माण करत असतात. पॅथोजनीक कृमींचेदेखील काही प्रकार आहेत. पहिल्या प्रकारात उवा, लिखा, यासारख्या शरीराबाहेर असणार्या कृमींचा उल्लेख करता येईल. यांच्यामुळे त्वचेवर खाज सुटते.

दुसर्या प्रकारचे कृमी हे शरीरात असणारे जंत होत. शरीरात असणार्या जंतांमध्ये देखील वेगवेगळे प्रकार आहेत. यामध्ये काही जंत हे रक्तात तयार होतात, काही कफामुळे तयार होतात आणि काही विष्ठेमध्ये तयार होतात.

शरीरामध्ये जे कृमी तयार होतात त्याची कारणे



वेगवेगळी आहेत. अनेकदा व्यक्ती पोट बिघडले असताना किंवा अपचन झालेले असतानादेखील जेवतात. काही जण आंबट, गोड यासारखे पदार्थ किंवा पेय खूप जास्त प्रमाणात सेवन करतात. बेसन, उडीद, यासारखे पीठ किंवा गुळापासून तयार केलेले गोड पदार्थ जास्त प्रमाणात सेवन करणे, व्यायाम न करणे, दिवसा झोपणे, दूध-फळे, दूध आणि खारट पदार्थ असे गुणधर्माने विरुद्ध असणारे पदार्थ एकत्र करून खाणे, शिळे, नासलेले पदार्थ खाणे, भाज्या स्वच्छ न धुता खाणे यासारख्या वेगवेगळ्या कारणाने कृमी होण्याची शक्यता वाढते.रक्तात जे कृमी तयार होतात ते अतिशय सूक्ष्म आणि लाल रंगाचे असतात. या कृमींमुळे डोक्याचे केस गळणे, अंगावरचे केस गळणे, पापण्यांचे केस गळणे, नखे वारंवार तुटणे, अंगावर सतत काटा येणे, खाज सुटणे यांसारखी लक्षणे दिसतात. शरीरात कफ वाढल्यास देखील कृमी तयार होतात. हे कृमी वेगवेगळ्या प्रकारचे असतात. खाल्लेले अन्न जेथे साठते तेथे हे तयार होतात.या प्रकारचे कृमी वेगवेगळ्या आकाराचे आणि रंगांचे असतात. काही गोलाकार, काही जाड तर काही चपटे असतात. काही दोर्याप्रमाणे बारीक असतात तर काही पांढर्या, तांबड्या रंगाचे असतात. या प्रकारच्या जंतांमुळे तोंडाला पाणी सुटते, उलटी येते, तोंडाला चव राहत नाही. अन्नाचे पचन नीट होत नाही. ताप येतो, काही वेळा बेशुद्ध अवस्थादेखील येते. उत्साह वाटत नाही. सतत जांभया किंवा शिंका येतात. पोटात गॅस होतो.

# आ.नितेश राणे,सागर बेग यांच्यावर गुन्हा दाखल

## सायबर पोलिसांचा युद्ध पटलीवर तांत्रिक तपास सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ अचलपूर**

अचलपुर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानात आयोजित धार्मिक सभेत वादग्रस्त भाषण करून दोनसमाजांमध्ये धार्मिक व्देष निर्माण केल्याप्रकरणी अचलपुर पोलिस ठाण्यात भाजपचे आमदार नितेश राणे व सागर बेग यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तर परतवाडा पोलिस ठाण्यात तांत्रिक पुराव्यासह आलेल्या तक्रारीवरून इंस्टाग्राम लाईव्ह वर आक्षेपार्ह कमेंटकरणाऱ्या चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासह ग्रामीण सायबर पोलिस ठाण्यात युध्दपातळीवर तांत्रिक तपास करून कमेंट टाकणाऱ्यांना ट्रेस करण्याचे काम सुरू असून शेकडोंवर गुन्हे दाखल होणार असल्याचे एसपी विशाल आनंद यांची स्पष्ट केले आहे.सकल हिंदु समाजातर्फे २९ सप्टेंबर रोजी अचलपुर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात भाजपचेआमदार नितेश राणे यांच्या धार्मिक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर नितेश राणे यांच्यासह नगर जिल्ह्यातील कोपरगावचे सागर बेग देशील होते. दोन्ही नेत्यांनी मंचावरून मुस्लिम धर्मियांबद्दल हिंदू समाजामध्ये जातीय व धार्मिक व्देष निर्माझा होईल, या उद्देश्याने जाणीवपूर्वक भाष्य केल्याची तक्रार अचलपुर येथील हिरापुर



परिसरात राहणाऱ्या इमरान खान असलम खान (२८) यांनी अचलपुर पोलिस ठाण्यात दाखल केली. त्यानुसार अचलपुर पोलिसांनी नितेश राणे व सागर बेग यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# मेळघाटातील अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करावात-जिल्हाधिकारी सौरभ कटियार




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**

सिमाडोह येथील अपघातानंतर मेळघाटातील अपघाताचा मुद्दा गांभीर्याने समोर आला आहे. यावर तातडीने उपाययोजना कराव्या लागणार आहे. त्यामुळे शक्य असलेल्या ठिकाणी रस्ता रूंदीकरण, संरक्षण कठडे उभारणे आणि परिवहन मंडळाच्या बसेसच्या फेऱ्या तातडीने वाढवाव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिल्या.जिल्हाधिकारी कार्यालयात सिमाडोह येथील खासगी बस अपघाताच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या उपाययोजनांबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, अपघात रोखण्यासाठी सार्वजनिक बांधकाम, परिवहन आणि परिवहन महामंडळातर्फे एकत्रित उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे सांगितले. परिवहन महामंडळाच्या बसेसची संख्या आणि वेळेवर बसेस नसल्यामुळे नागरिक खासगी बसेसमधून नाईलाजाने प्रवास करतात. त्यामुळे परिवहन मंडळाने बसेसच्या फेऱ्या वाढवाव्यात. तसेच प्रवाशांच्या गरजेनुसार बसेसचा वेळ ठरविण्यात यावा. यामुळे खासगी बसमधून प्रवास करणाऱ्यांची संख्या नियंत्रणात येईल.मेळघाटातील रस्ते अरूंद आहेत. तसेच वळणाचे रस्ते असल्यामुळे याठिकाणी अपघाताची शक्यता वाढत असते. त्यामुळे आवश्यक त्या ठिकाणी फलक लावण्यात यावेत. तसेच रस्ता रूंदीकरण आणि अपघात प्रवण क्षेत्रात संरक्षक कठडे उभारण्यात यावेत. अपघातासाठी खासगी वाहनांचा अतिवेग कारण असल्यामुळे परिवहन विभागाने पोलिसांसोबत वाहनांची तपासणी करण्यात यावी. यात अतिवेगासोबतच मर्यादेपेक्षा जादा प्रवासी असल्यास कारवाई करावी. त्यामुळे खासगी वाहतुकीवर अंकुश लागण्यास मदत होईल.वन विभागाच्या परवानगी अभावी नवीन रस्त्यांचे कामे करणे शक्य नाही. मात्र खडीकरण करून रस्ते रूंद करणे तातडीने शक्य आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या रूंदीकरणाचा प्रस्ताव तातडीने सादर करावा. त्यामुळे भविष्यात याठिकाणी रूंद रस्ते तयार होण्यास मदत होईल. यासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया सुरू करावी, असे निर्देश दिले.

# नोटीस मिळताच ३६५० वाहन चालकांनी भरले ई-चलान

## १३० लाख ५९ हजार रुपयांचा दंड वसुल

### लोकअदालतीमध्ये २४१ प्रकरणांचा निपटारा



**चालकानी ई-चलानची रक्कम भरावी**

वाहनचालकांनी वाहनांवरील प्रलंबित ई-चलान सेटलमेंट रक्कम त्वरित भरावी. सुरळीत व सुरक्षित वाहतूक तसेच रस्ता सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी वाहतूक विभागाला आवश्यक ते सहकार्य करा. जीवन अनमोल आहे, प्रत्येकाने आपल्या कामाचे नियोजन करून वेळेचे योग्य नियोजन केले पाहिजे, वाहनचालकांनी वेळेचे नियोजन व वाहतुकीचे नियम पाळले, तर जीवघेणे अपघात व वित्तहानी टाळू शकते. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करून आर्थिक नुकसान टाळण्यासाठी अमरावती शहरातील वाहतूक विभागाने आवाहन केले आहे.

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती** महाराष्ट्र राज्य विधी न्याय प्राधिकरण सेवातर्फे पार पडलेल्या लोकअदालतीत वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १,३७,५८२ वाहनधारकांविरुद्ध ३ लाख १४ हजार २८० (२० कोटी २६ लाख ८८ हजार ७५० रुपये इतकी) प्रलंबित प्रकरणे ठेवण्यात आली होती.

वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पांतर्गत, वाहन चालकांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर न भरलेल्या ई-चलनाच्या दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी २९ ऑगस्टपासून नोटिसा पाठविणे सुरू करण्यात आले.

नोटीस प्राप्त झाल्यानंतर २७ सप्टेंबरपर्यंत ३४०९ वाहनचालकांनी २८ लाख ५० हजार १०० रुपयांची सेटलमेंट रक्कम भरली आहे. तसेच २८ सप्टेंबर रोजी अमरावती न्यायालय परिसरात झालेल्या लोकअदालतीमध्ये वाहन चालकांनी उपस्थित राहून २४१ न्यायालयात रक्कम भरली. अशाप्रकारे, वाहतूक नियमांच्या उल्लंघनाच्या एकूण ३६५० प्रकरणांचे निपटारा करण्यात आले आहे. मोटार वाहन कायद्यांतर्गत प्रलंबित ई-चलान प्रकरणातील तडजोडीची रक्कम वसूल करण्यासाठी अमरावती शहराच्या वाहतुक शाखेकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, गैरसोय टाळण्यासाठी सर्व वाहनधारकांना महाट्रॅफिक ॲप किंवा वेबसाइट लिंकद्वारे त्यांच्या वाहनावरील प्रलंबित ई-चलान तपासून ऑनलाइन किंवा शहर वाहतूक शाखेत तत्काळ सेटलमेंटची रक्कम भरण्याचे आवाहनकरण्यात आले होते.

# नांदगाव खंडेश्वर येथे स्वच्छता ही सेवा मोहिमेला सुरुवात




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती,** नेहरू युवा केंद्रतर्फे नांदगाव खंडेश्वर येथे स्वच्छता ही सेवा मोहीमेला सुरवात करण्यात आली. यात नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदविला.जिल्हा समन्वयक स्नेहल बासुतकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा २०२४ मोहीम राबविण्यात येत आहे. यात स्वच्छतेचे महत्त्व, स्वभाव स्वच्छता आणि संस्कार स्वच्छता यांचे पालन करण्यात येत आहे. गांधी जयंती अगोदर परिसर स्वच्छ करणे, दररोज परिसर स्वच्छ ठेवणे आणि आरोग्य निरोगी राहावे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांना भूपेंद्र जेवडे यांनी स्वच्छतेची शपथ दिली. स्वच्छता मोहिमेला ड. मोहन जाधव, भुमेश्वर गोरे, आकाश मंगळे, पवन जेवडे, निलेश हळदे, सचिन डोक यांनी पुढाकार घेतला.

नया अकोला येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिरअमरावती, दि. ३० : उपमुख्यमंत्री सामुदायिक मोफत आरोग्य तपासणी शिबीर नया अकोला येथे पार पडले.शिबिरात कर्करोग, हृदयरोग, मेंदू, लघवी, किडनी आजार, किडनी प्रत्यारोपण, प्लास्टिक सर्जरी, बालरोग, एनसीडी आजाराशी संबंधित रुग्ण तपासणी करण्यात आली. यात ९२ रुग्णांपैकी २५ रुग्ण विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. शिबिरासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे, नोडल अधिकारी डॉ. श्याम गावंडे यांनी मार्गदर्शन केले. तपासणीसाठी डॉ. सपना गुप्ता, वैद्यकीय अधिकारी दिनेश हिवराळे, लेखापाल भूपेंद्र जेवडे, अधिपरीचारीका प्रतिभा सोळंके, एस. एस. खेडेकर, आशा जी. एच. निमकर, सुनंदा ढोक, योगिता घोम, राजकन्या बुरडे, आरती बागडे, दिपक शर्मा यांनी सहकार्य केले.

# दहेंद्री ग्रामपंचायतीला गावकऱ्यांनी ठोकले कुलूप

## गावात पाण्याची कृत्रिम टंचाई गावकरी आक्रमक



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मेळघाट** चिखलदरा तालुक्यातील दहेंद्री या गावात मागील पंधरा दिवसापासून पाण्याची नळ योजना बंद असल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामूळे संतप्त झालेल्या ग्रामपंचायत गावकऱ्यांनी कार्यालयालाच कुलूप ठोकत आंदोलन केले.

या गावाची लोकसंख्या दोन हजाराच्या जवळपास आहे. दुषीत स्त्रोतमधील पाणी गावकरी पीत असल्याने गावात पुन्हा साथरोग पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. गावातील नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाची नेहमी पाण्यासंबंधित चर्चा व तक्रारकरूनही ग्रामपंचायत प्रशासन मार्फत गावात पाण्याची समस्या सोडविण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त नागरिकांनी व महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयाला ताला ठोको आंदोलन करून आपला संताप व्यक्त केला. गावातील पुरुष व महिलांनी ग्रामपंचायत ला कुलूपलावले व ग्रामपंचायत च्या विरोधात नारे बाजी केली. यामध्ये प्रामुख्याने कला पडलीवार, लता येवले, काशी येवले, फुला सेलूकर, गंगा मुंडे, सुरेंद्र पोटे, संजू पोटे, रोशन बेलकर, काशीराम कास्देकर इत्यादी गावातील नागरिक उपस्थित होते.

कलर बॉक्सपाणीपुरवठ्याची मेन लाईन बीडच्या पाईपची आहे व ज्या ठिकाणी पाईपलाईन फुटली आहे, त्या ठिकाणी गावातील एका व्यक्तीचे घर आहे. त्या ठिकाणी खोदकाम करता येत नाही. तात्पुरती व्यवस्था म्हणून आपण पाईप वेल्डिंग करणार आहोत. उद्या पर्यंत पाणीपुरवठा सुरू करू, पाईप लाईन दुरुस्त करणारा कारागीर बोलावला आहे. लवकरच नागरिकांना पाणी मिळेल.

**रवी बेठेकर, सरपंच दहेंदी.**

पंधरा दिवसापासून पाणीपुरवठ्याची योजना बंद आहे. वारंवार सरपंच, सचिव यांना या बाबतीत सांगितले. वेळोवेळी सांगुन सुध्दा पाणी सुरू झाले नाही. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या आहे. हातपंप व इतर ठिकाणावरून नागरिकांना पाणी भरावे लागते.

**संदीप मुंडे, गावकरी, ग्राम दहेंद्री.**

मला चार दिवसा आधीच ग्रामपंचायतचा चार्ज मिळाला आहे. पूर्ण चार्ज मिळायचा आहे. खाते बदल सुद्धा व्हायचे आहे. तरी एक-दोन दिवसात फुटलेली पाईपलाईन दुरुस्त करून दहेंद्री गावाचा पाणीपुरवठा सुरळीत करणार आहोत.

**योगेश माहुरे, सचिव ग्रामपंचायत दहेंदी.**

# सणउत्सव कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश जारी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ अमरावती,** जिल्ह्यात आगामी काळात सण उत्सव साजरे होणार आहेत. या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे.जिल्ह्यात नवरात्री उत्सवास प्रारंभ होणार आहे, तसेच दुर्गा विसर्जन, विविध कर्मचाऱ्यांचा संप सुरू आहे, या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ३६ नुसार पोलीस आयुक्तालयाच्या परिसरातील दि. २ ते दि. १६ ऑक्टोबरच्या मध्यरात्री पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू राहणार आहे.

# शासकिय सेवेत नेहमी सकारात्मक भूमिकेतून काम करावे-चौधरी

## सेवानिवृत्ती निमित्य खंडाळकर यांचा गौरव



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती-**

शासकीय सेवेत काम करतांना नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम केल्यास केलेल्या कामाची प्रशासन तसेच सर्वसामान्य जनतेकडून दखल घेतली जाते. महिती व जनसंपर्क विभागात काम करतांना नितीन खंडारकर यांनी नेहमीच प्रत्येक काम सकारात्मक भावना ठेवूनच केले आहे. निवृत्ती नंतरही असाच दृष्टिकोन बाळगावा असे प्रतिपादन निवृत्त माहिती संचालक शरद चौधरी यांनी केले.अमरावती येथील विभागीय माहिती कार्यालयातील टीव्ही कॅमेरामन नितीन खंडारकर यांना सेवानिवृत्त निमीत्त निरोप देण्यात आला. यावेळी निवृत्त माहिती संचालक भि.म.कौसल, माहिती व जनसंपर्क विभागाचे माध्यमसमन्वय अधिकारी अनिल गडेकर, निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी चंद्रकांत क्षिरसागर, नरेश मेश्राम, पी.डी खडसे, श्यामलाल कासदेकर, प्र.सु. हिरुळकर, राकेश चौधरी आदी उपस्थित होते.

शासकीय सेवेत निवृत्ती ही अपरिहार्य आहे. परंतु सेवाकाळ केलेल्या विविध कामांप्रती आपली सचोटी व निष्ठा जपणे महत्वाचे आहे. प्रशासकीय सेवेक म्हणून विविध जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. तसेच जनतेप्रती असलेली आपली सेवावृत्ती महत्वाची ठरते. नकारात्मकता सोडून दैनंदिन प्रशासकीय कामे वेळेत पूर्ण होतील व आपल्या कामांमुळे प्रशासनाची प्रतिमा उंचावेल ही भवना ठेवून काम करण्याची आवश्यकता आहे. हीच भावना सर्व कर्मचाऱ्यांमध्ये असावी. सेवानिवृत्त नितीन खंडारकर यांच्या सेवाकाळात जोपासलेली भावना महत्वाची असल्याचे यावेळी शरद चौधरी यांनी सांगितले.सेवानिवृत्त संचालक, भि.म. कौसल, सेवानिवृत्त जिल्हा माहिती अधिकारी चंद्रकांत क्षिरसागर, नरेश मेश्राम, पि.डि खडसे, श्यामलाल कासदेकर, प्र.सु. हिरुळकर, अनिल गडेकर यांनी नितीन खंडारकर यांच्या सेवाकाळातील विविध आठवणी तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यां प्रती असलेल्या सहकार्य भावनेचा उल्लेख केला. सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना सेवानिवृत्ती प्रित्यर्थ निमंत्रित केल्याबद्दल यावेळी त्यांचे अभिनंदन करण्यात आले.प्रारंभी सेवानिवृत्ती प्रित्यर्थ नितीन खंडारकर यांना शाल श्रीफळ व भेट वस्तु देवून सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यातर्फे गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन चंद्रकांत क्षिरसागर यांनी तर आभार प्र.सु.हिरुळकर यांनी मानले. यावेळी देविदास मिसाळकर, नंदु डोंगरे, देविदास जोशी, मनीष झिमटे, कुमार हरदुले आदी यावेळी उपस्थित होते.

# ऑक्टोबरमध्ये ६ बदल, व्यावसायिक सिलिंडर ४८ रुपयांनी महागला

## पॅनकार्ड आणि सुकन्या समृद्धी योजनेचे नियम बदलले; विमान तिकिटे स्वस्त होऊ शकतात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली–** आजपासून म्हणजेच १ ऑक्टोबर २०२४ पासून १९ किलोचा व्यावसायिक गॅस सिलिंडर ४८ रुपयांनी महागला आहे. आता दिल्लीत १७४० रुपयांना मिळणार आहे. त्याचबरोबर पीपीएफ आणि सुकन्या खात्याशी संबंधित नियमांमध्येही बदल करण्यात आला आहे. पॅन कार्ड बनवण्यासंबंधीचे नियमही बदलण्यात आले आहेत.

याशिवाय विमान इंधनाच्या किमती घसरल्याने हवाई प्रवास स्वस्त होऊ शकतो. तेल विपणन कंपन्यांनी एव्हिएशन टर्बाइन इंधन च्या किमती ६,०९९ रुपये प्रति किलोलिटर (१००० लीटर) कमी केल्या आहेत.

**ऑक्टोबर महिन्यात होणार ६ बदल**

**१. व्यावसायिक गॅस सिलिंडर झाला महाग :** किंमत ४८ रुपयांनी वाढली, घरगुती सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल नाही

आजपासून १९ किलोचा व्यावसायिक सिलिंडर ४८.५० रुपयांनी महागला आहे. दिल्लीत त्याची किंमत ४८.५० रुपयांनी वाढून १७४० रुपये झाली. यापूर्वी ते ₹१६९१.५० मध्ये उपलब्ध होते. कोलकातामध्ये, ते ₹ १८५०.५० वर उपलब्ध आहे, ४८ रुपयांनी वाढून, पूर्वी त्याची किंमत ₹ १८०२.५० होती.

मुंबईत सिलिंडरची किंमत ४८.५० रुपयांनी वाढून १६४४ रुपयांवरून १६९२.५० रुपयांवर पोहोचली आहे. चेन्नईमध्ये १९०३ रुपयांना सिलिंडर उपलब्ध आहे. मात्र, १४.२ KG घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. हे दिल्लीमध्ये ₹८०३ आणि मुंबईमध्ये ₹८०२.५० मध्ये उपलब्ध आहे.

२. एटीएफ ४,५६७.७६ रुपयांनी स्वस्त: हवाई प्रवास स्वस्त होऊ शकतो

तेल विपणन कंपन्यांनी महानगरांमध्ये एअर ट्रॅफिक फ्युएल च्या किमती कमी केल्या आहेत. त्यामुळे विमान प्रवास स्वस्त होऊ शकतो. इंडियन ऑइलच्या वेबसाइटनुसार, दिल्लीतील एटीएफ ५८८३ रुपयांनी स्वस्त झाले असून ते ८७,५९७.२२ रुपये प्रति




किलोलिटर (१००० लिटर) झाले आहे. त्याच वेळी, कोलकात्यात एटीएफ ५,६८७.६४ रुपयांनी स्वस्त झाले असून ते ९०,६१०.८० रुपये प्रति किलोलिटर झाले आहे.

मुंबईत एटीएफ ८७,४३२.७८ रुपये प्रति किलोलीटर दराने उपलब्ध होता, आता तो ५,५६६.६५ रुपयांनी स्वस्त होऊन ८१,८६६.१३ रुपयांना उपलब्ध होईल. चेन्नईमध्ये ATF ची किंमत ६,०९९.८९ रुपयांनी कमी झाली आहे. आता ते ९०,९६४.४३ रुपये प्रति किलोलिटर दराने उपलब्ध आहे.

**३. PPF खात्याच्या नियमांमध्ये बदल: अल्पवयीनांसाठी वेगळे व्याज**

आजपासून पीपीएफ खात्याशी संबंधित नियमांमध्ये बदल करण्यात आला आहे. नवीन नियमांनुसार, जर झझक्र खाते अल्पवयीन व्यक्तीच्या नावावर असेल, तर पोस्ट ऑफिस बचत खात्याचा व्याजदर तो १८ वर्षांचा होईपर्यंत लागू होईल. खातेदाराचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच खात्यावर पीपीएफचा सध्याचा व्याजदर लागू होईल. खात्याचा परिपक्वता कालावधी त्या तारखेपासून मोजला जाईल.

त्याच वेळी, एखाद्याचे एकापेक्षा जास्त पीपीएफ खाते असल्यास, व्याज दर एका मूळ मुख्य खात्यावर दिला जाईल. जर मुख्य खात्यातील रक्कम विहित गुंतवणूक मर्यादेपेक्षा (१.५ लाख) कमी असेल, तर दुसऱ्या खात्यातील रक्कम पहिल्या खात्यात विलीन केली जाईल. या विलीनीकरणानंतर, तुम्हाला पीपीएफच्या व्याजदरानुसार एकूण रकमेवर व्याज दिले जाईल. तथापि, दोन्ही खात्यांची एकत्रित रक्कम १.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावी.

**४. सुकन्या समृद्धी योजना खाते:** फक्त कायदेशीर पालक खाते उघडण्यास सक्षम असतील

केंद्र सरकारकडून विशेषतः मुलींसाठी चालवल्या जाणाऱ्या सुकन्या समृद्धी योजनेशी संबंधित एक मोठा बदल करण्यात आला आहे. या अंतर्गत, आतापासून फक्त मुलींचे कायदेशीर पालकच त्यांच्या नावावर ही खाती उघडू आणि ऑपरेट करू शकतील.

जर एखाद्या मुलीचे सुकन्या खाते तिच्या कायदेशीर पालक नसलेल्या व्यक्तीने उघडले असेल, तर तिला हे खाते तिच्या कायदेशीर पालकांकडे हस्तांतरित करावे लागेल. तसे न केल्यास ते खाते बंद केले जाऊ शकते.


**५. पॅनसाठी नियम बदलले:** आधार नोंदणी आयडी वापरता येणार नाही आतापासून आयकर भरण्यासाठी किंवा पॅन कार्ड बनवण्यासाठी आधार क्रमांकाच्या जागी आधार नोंदणी आयडी वापरला जाणार नाही. पॅन क्रमांकाचा गैरवापर रोखणे हा या बदलाचा उद्देश आहे. यासोबतच एखाद्या व्यक्तीला एकापेक्षा जास्त पॅनकार्ड बनवण्यापासूनही प्रतिबंध केला जाईल.

**६. व्यवहार शुल्क कमी केले:** NSE आणि BSE ने स्लॅब रचनेत बदल केले

NSE आणि BSE ने रोख आणि फ्युचर्स आणि ऑप्शन्स ट्रेडसाठी आकारले जाणारे व्यवहार शुल्क बदलले आहे. NSE मधील रोख बाजारासाठी व्यवहार शुल्क आता रु. २.९७/लाख ट्रेडेड मूल्य असेल. तर, इक्विटी फ्युचर्समधील व्यवहार शुल्क रु. १.७३/लाख ट्रेडेड व्हॅल्यू असेल.

तर, पर्यायांचे प्रीमियम मूल्य रु. ३५.०३/लाख असेल. चलन डेरिव्हेटिव्ह विभागामध्ये, छढए ने फ्युचर्ससाठी व्यवहार शुल्क रु ०.३५/लाख ट्रेडेड मूल्यावर ठेवले आहे. चलन पर्याय आणि व्याजदर पर्यायांमध्ये, हे शुल्क रु. ३१.१/लाख प्रीमियम मूल्य असेल.

# नवरात्रोत्सवाची तयारी २२१ सार्वजनिक मंडळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१वरुड –** वरूड तालुक्यात वरूड, शेंदूरजनाघाट, बेनोडा (शहीद) या पोलिस स्टेशनअंतर्गत २२१ नवदुर्गा देवीची स्थापना ३ ऑक्टोबरला होणार आहे. शहरी व ग्रामीण भागात नवरात्रीला उत्सवाला प्रारंभ होणार असून, सार्वजनिक दुर्गा मंडळांनी विविधरंगी विद्युत रोषणाई, आकर्षक देखाव्यांची तयारी सुरू आहे, तर पोलिस प्रशासनानेसुद्धा कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावा म्हणून बैठकांचे सत्र चालविले आहे. हा उत्सव शांततेत आनंददायी साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

**नवरात्रोत्सवाला ३ ऑक्टोबर पासून–** प्रारंभ होत असून, घटस्थापना होणार आहे. वरूड पोलिस स्टेशनअंतर्गत शहरात ४५, तर ग्रामीण भागात ५४ सार्वजनिक दुर्गा मंडळ, शेंदूरजनाघाट पोलिस स्टेशनअंतर्गत शहरात ३०, तर ग्रामीण भागात २८ आणि बेनोडा पोलिस स्टेशनअंतर्गत बेनोड्यामध्ये ४, तर ग्रामीण भागात ६०, असे एकूण २२१ सार्वजनिक दुर्गा मंडळ आणि उत्सवाची जय्यत तयारी सुरू केली आहे. तालुक्यातील तीनही पोलिस स्टेशन हद्दीतील शहरी व ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व दुर्गा मंडळांच्या सदस्यांच्या बैठकीचे आयोजन करून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# १ ऑक्टोबर पासून काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

## ज्येष्ठ नेत्यांवर जबाबदारी, जिल्ह्यात जाऊन घेणार मुलाखती

### नेते १० ऑक्टोबरला मुलाखतीचा गोपनीय अहवाल प्रदेश काँग्रेसला सादर करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई,** विधान सभेच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीची तयारी म्हणून काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी मागितलेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती मंगळवारी दि. १ ऑक्टोबर पासून घेतल्या जाणार आहेत. ज्येष्ठ नेत्यांवर या मुलाखतीची जबाबदारी सोपवण्यात आली असून हे नेते आपल्याला नेमून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन मुलाखती घेऊन आपला अहवाल देणार आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविले होते. याला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून काँग्रेस पक्षाकडे एकूण १६८८ इच्छुकांनी उमेदवारी मागितलेली आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या निर्देशानुसार व प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या मान्यतेने सर्व इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींसाठी काँग्रेस पक्षाने ज्येष्ठ नेत्यांवर जबाबदारी सोपवली आहे.



माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे पुणे शहर व पुणे ग्रामीण, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान यांच्याकडे नागपूर शहर व ग्रामीण, खा. चंद्रकांत हंडोरे यांच्याकडे ठाणे जिल्हा, खा. प्रणिती शिंदे यांच्याकडे सांगली व सातारा जिल्हा, मुजफ्फर हुसेन यांच्याकडे अहमदनगर आ. कुणाल पाटील यांच्याकडे नाशिक, माजी मंत्री विधान परिषदेतील गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्याकडे मुंबई शहर, अमित देशमुख यांच्याकडे सोलापूर व कोल्हापूर, डॉ. नितीन राऊत यांच्याकडे वर्धा व यवतमाळ, यशोमती ठाकूर यांच्याकडे परभणी व हिंगोली, डॉ. विश्वजीत कदम यांच्याकडे नांदेड, प्रा. वसंत पुरके यांच्याकडे अकोला, खा. नामदेव किरसान यांच्याकडे वाशीम, खा. डॉ. कल्याण काळे यांच्याकडे लातूर व बीड, खा. डॉ. शोभा बच्छाव यांच्याकडे जालना, आ. संग्राम थोपटे यांच्याकडे मुंबई उपनगर, डॉ. वजाहत मिर्झा यांच्याकडे संभाजीनगर, एम.एम. शेख यांच्याकडे धाराशिव, हुसेन दलवाई यांच्याकडे पालघर, शिवाजीराव मोघे यांच्याकडे धुळे व नंदुरबार, सुरेश शेट्टी यांच्याकडे सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड, आ. अभिजीत वंजारी चंद्रपूर व गडचिरोली, सतीश चतुर्वेदी भंडारा व गोंदिया, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांच्याकडे बुलढाणा व अमरावती, ची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. हे नेते दिनांक १ ते ८ क्टोबरपर्यंत आपल्याला नेमून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतील व १० क्टोबर पर्यंत आपला गोपनीय अहवाल प्रदेश काँग्रेसला सादर करतील, अशी माहिती प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी दिली आहे.

# भातकुली तालुक्यात भुकंपाचे सौम्य धक्के

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१टाकरखेडा संभु**
टाकरखेडा शंभू ,आष्टी, मार्की , साऊर, रामा, जळका हिरापूर, देवरी निपाणी, पूर्णानगर येथे खळबळटाकरखेडा संभू, भातकुली तालुक्यातील काही गावांमध्ये सोमवारी दुपारी १. ४५ वाजताच्या सुमारास भुकंपाचा सौम्य धक्का जाणवला. टाकरखेडा संभूसह ,आष्टी, मार्की , साऊर, रामा, जळका हिरापूर, देवरी निपाणी, पूर्णानगर या गावांमध्ये भुकंपाचे धक्के बसल्याने एकच खळबळ उडाली.

जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये सोमवारी दुपारी १.३० ते १.४५ वाजताच्या सुमारास अचानक भुकंप झाल्याची चर्चा सुरू झाली आणि एकच खळबळ उडाली. यामुळे चर्चेला उधान आले होते. कोठे स्लॅब हलला तर कोठे मातीच्या घरांमध्ये भांडे पडल्याची देखील चर्चा सुरू होती. त्यामुळे तालुक्यांतील अनेकांनी प्रशासनाला देखील संपर्क साधुन भुकंपाची माहीती दिली.तालुक्यात टाकरखेडा संभू ,आष्टी, मार्की , साऊर, रामा, जळका हिरापूर, देवरी निपाणी, पूर्णानगर आदी गावांमध्ये भुकंपाचे धक्के जणावले.तहसिलदार अजित येळे यांनी देखील या प्रकाराची स्पुष्टी दिली.

> तालुक्यातील गावांमध्ये भुकंपाचे धक्के जाणवल्याची माहीती तलाठी व पोलिस पाटील यांच्याकडून मिळाली आहे. प्रशासन स्तरावर वरीष्ठांना तशी माहीती देण्यात आली आहे.त्यामुळे नागरीकांनी घाबरण्याचे काही कारण नाही.
> **तहसिलदार अजितकुमार येळे.**

# राज्याचा पुढचा मुख्यमंत्री काँग्रेसचाच असेल: काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण

## आघाडी १८० हून अधिक जागा जिंकून सरकार स्थापन करेल, असा विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई –** महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीत लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाची पुनरावृत्ती पक्ष करेल आणि राज्याचा पुढचा मुख्यमंत्री काँग्रेसचाच असेल, असा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. २८८ सदस्यीय विधानसभेत विरोधी महाविकास आघाडी १८० हून अधिक जागा जिंकून सरकार स्थापन करेल, असा विश्वासही चव्हाण यांनी व्यक्त केला.



पृथ्वीराज चव्हाण सातार्‍यातील पक्षाच्या कार्यक्रमात बोलत होते. यादरम्यान ते म्हणाले की, महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत आणि विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस आपल्या कामगिरीची पुनरावृत्ती करेल. महाराष्ट्राचा पुढील मुख्यमंत्री काँग्रेस पक्षाचाच असेल. महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ पैकी ३० जागा महाविकास आघाडीने जिंकल्या आहेत. त्यापैकी एकट्या काँग्रेसने १३ जागा जिंकल्या असून दुहेरी आकडा पार करणारा एकमेव पक्ष ठरला आहे.

२०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसला केवळ एक जागा मिळाली होती. या आघाडीत काँग्रेसशिवाय शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उद्धव ठाकरे यांच्याकडे असलेला शिवसेना पक्ष यांचा समावेश आहे. त्याचवेळी नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करणे युतीच्या नेत्यांनी टाळले आहे. मात्र, आपल्या पक्षाला जास्तीत जास्त जागा जिंकून सर्वोच्च पद मिळेल, असा आग्रह काँग्रेसचे पदाधिकारी धरत आहेत.

> **लोकसभेत काँग्रेसचा स्ट्राईक रेट चांगला होता – चव्हाण**
> या संदर्भात पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसचा स्ट्राइक रेट खूप चांगला होता. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने जिंकलेल्या ६५ टक्के जागांच्या आधारे, विधानसभा निवडणुकीत विरोधी आघाडी १८३ किंवा त्याहून अधिक जागा जिंकेल. विदर्भात काँग्रेस पुन्हा आपली पकड मिळवेल, जिथे गेल्या काही वर्षांत सत्ताधारी भाजप एक प्रमुख राजकीय शक्ती म्हणून उदयास आला आहे. चव्हाण म्हणाले की, काँग्रेस विदर्भात विजयाचा उच्चांक गाठणार आहे. मराठवाड्यातील दलित, मुस्लिम आणि मराठा जनतेने आरक्षणाचा लाभ मिळावा, या मागणीसाठी लोकसभा निवडणुकीत महायुती किंवा भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएच्या उमेदवारांचा पराभव केला आहे.

# ६२०० गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण


## संचालक बापुसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात अभिनव उपक्रमाचे यशस्वी आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१चांदुर बाजार–** कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या दशसुत्रीचा कृतीशील विचार घेवून,श्री गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष तथा नागरवाडी इंद्रभुवनाचे शिल्पकार बापुसाहेब देशमुख तसेच मुंबई येथिल दानशुर नितीनजी दळवी यांच्या विशेष पुढाकारातून, जिल्ह्यातील ६२०० गरजू विद्यार्थ्यांना संपुर्ण शालेय साहित्य निशुल्क वितरणाचा संत गाडगेबाबा मोफत शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रम नुकताच पार पडला.

या उपक्रमात आदिवासी दुर्गम भागातील गरजू विद्यार्थी तसेच चांदुरबाजार,अमरावती,दर्यापुर, तेल्हारा,मुर्तिजापुर तालुक्यातील विद्यार्थ्यांना दानवीर नितीनजी दळवी समवेत मान्यवरांच्या हस्ते संपुर्ण शैक्षणिक साहित्य वितरण करण्यात आले.यामध्ये(नोटबुक,रजीस्टर,आलेखवही,चित्रकलावही,पेन,पेन्सिल,कंपास,रबर, शार्पनर, स्केचपेन ) शाळेतील मुलांनाकरीता सुंदर चॉकलेट बिस्किट यासह.प्रत्येक शाळेला एक सुंदर घड्याळ भेट देण्यात आले. दरम्यान शाळेतील संपुर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सुंदर शर्ट पीस,टॉवेल मिठाई.महिलांना साडीचोळी भेट स्वरुपात देत ज्ञानदानाच्या अतुलनीय कार्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रामुख्याने स्वत: निरक्षर असुन जनमाणसाला किर्तनाच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्व पटवुन देणार, कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या विचारांना जोपासत, खर्या अर्या अर्थाने गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळावा. या उदात्त हेतून संत गाडगेबाबा मोफत शैक्षणिक साहित्य वाटप या अभिनव उपक्रमाचे आयोजन केले असल्याचे संचालक बापुसाहेब देशमुख बोलत होते. विशेषत: शैक्षणिक क्षेत्रात मुलांची भरघोस प्रगती व्हावी या सोबतच तळागळातील गरीब विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येवून त्याला दर्जेदार शिक्षण मिळावे, या करीता येत्या २०२५-२६ शैक्षणिक वर्षात १०० शाळांची निवड करुन, प्रत्येक गरजू विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य मोफत वितरण केल्या जाणार असल्याचे प्रतिपादन मुंबई येथिल दानशुर नितीनजी दळवी यांनी यावेळी केल. । अभिनव अशा उपक्रमाच्या यशस्वीतेकरीता सर्वेसर्वा बापुसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात संचालक सागर देशमुख, संचालक गजानन देशमुख, आदिंसह श्री गाडगे महाराज संस्था नागरवाडी येथिल सेवक मंडळींनी विशेष परिश्रम घेतले. प्रामुख्याने या स्थुत्य उपक्रमाच्या आयोजनाबद्दल अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे तसेच अचलपुर मतदारसंघाचे आमदार बच्चु कडू यांनी विशेष कौतूक केले आहे.

# कस्तुरबा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची क्रीडा क्षेत्रातील उत्तुंग भरारी ' तसेच 'माझी शाळा सुंदर शाळा टप्पा' २ मध्ये केंद्रातून प्रथम '



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्थाद्वारा संचालित कस्तुरबा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात विविध खेळांमध्ये नावीन्य प्राप्त केले. जिल्हा क्रीडा संकुल,तपोवन,मार्डी रोड, अमरावती, येथे जिल्हास्तरीय विविध स्पर्धेचे आयोजन केल्या गेले. त्यामध्ये १७ वर्षे वयोगटाखाली 'जलतरण' स्पर्धेत देवांश मसरेनी ५० मीटर बेस्ट स्ट्रोक मध्ये प्रथम, १०० मीटर बेस्ट स्ट्रोक मध्ये दुसरा क्रमांक व २०० मीटर बेस्ट स्ट्रोक मध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. १४ वर्षे वयोगटाखालील 'जलतरण' स्पर्धेत आरोही दिनेश मसरेनी १०० मीटर बेस्ट स्ट्रोक मध्ये प्रथम क्रमांक, २०० मीटर बेस्ट स्ट्रोक मध्ये दुसरा क्रमांक, २०० मीटर फ्री स्टाइल यामध्ये तिसरा क्रमांक पटकाविला, तसेच ११ वर्षे वयोगटातील 'रोलर स्केटिंग' स्पर्धेत युवराज सुमित गावंडे या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकाविला व १४ वर्षे वयोगटाखालील 'रोलर स्केटिंग' स्पर्धेत ईश्वरी शरद मोहोड हिने तिसरा क्रमांक पटकाविला,तसेच १७ वर्षे वयोगटाखालील इयत्ता ८ वी ची कु.कृतिका मिसळ,१४ वर्षे वयो गटाखालील सुमित राजपूत व नैतिक वरकील या विद्यार्थ्यांनी 'शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धा' सत्र २०२४-२५ क्रीडा संकुल, विद्यापीठ समोर, तपोवन,येथे झालेल्या तलवारबाजीत यश संपादन केले व त्या विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड झालेली आहे. विद्यार्थ्यांनी .नुकत्याच झालेल्या विभागीय स्तरावर 'जलतरण' स्पर्धेमध्ये देवांश मसरे व आरोही मसरे या विद्यार्थ्यांनी पुनच्छ :एकदा जलतरण स्पर्धेत यश संपादन केले व त्यांची राज्यस्तरासाठी निवड झालेली आहे.शाळेतील क्रीडा शिक्षक विकास रुईकर सर व क्रीडा शिक्षिका स्नेहा सावरकर मॅडम यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. शाळेच्या मुख्याध्यापिका, श्रीमती साधना चंदेल मॅडम यांनी या विद्यार्थ्यांचे पुनश्च एकदा अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कस्तुरबा इंग्लिश स्कूल नेहमी काही उल्लेखनीय कामगिरी करीत असते. ती खेळ असो किंवा विविध नाविन्यपूर्ण उपक्रम असो. नुकत्याच झालेल्या 'माझी शाळा सुंदर शाळा' टप्पा -२ मध्ये पुन्हा एकदा कस्तुरबा इंग्लिश स्कूल ही केंद्रातून प्रथम आलेली आहे. यासाठी शाळेचे व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ४० वर्षे देशसेवा करून गावात परतणाऱ्या जवानाच जंगी स्वागत

## गावकऱ्यांनी डीजे लावत काढली गावातून मिरवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१तिवसा**



सैन्य दलात भारती होऊन देशसेवा करण्याची अनेकांची स्वप्ने असतात.पण हे स्वप्न प्रत्येकाचंच पूर्ण होत नाही.सैनिक सीमेवर जीवाची बाजी लावून देशाचं संरक्षण करतात.पण हा सैनिक जेंव्हा देशसेवा करून पुन्हां एकदा घरी परतते तेंव्हा प्रत्येकाच उर अभिमानाने भरून येतो.असाच क्षण तिवसा तालुक्यात पाहायला मिळाला.चाळीस वर्षे देशाच रक्षण करून सुखरूप घरी परतणाऱ्या एका जवानाच तिवसा तालुक्यात व त्यांच्या गावी(तळेगाव ठाकुर) येथे स्वागत करण्यात आले.

गणेश बायस्कर यांनी ४० वर्षे सीमेवर देशसेवा केली.सेवा निवृत्त होऊन गावी आल्यानंतर खुल्या जीप मध्ये बसवून,बँड बाजा व डीजे वाजवून त्यांचं स्वागत केल.संपूर्ण तळेगाव ठाकुर गाव पुष्पगुच्छ व हर घेऊन स्वागता साठी उभे होते.गणेश बायस्कर हे तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकुर येथील रहिवाशी आहे.

दोन दिवसापूर्वी गणेश बायस्कर हे सैन्य दलातून निवृत्त झाले.निवृत्ती नंतर त्यांना अनोखी भेट म्हणून तिवसा तालुका माजी सैनिक संघटना यांनी अचानक झालेलं हे स्वागत पाहून जवान गणेश बायस्कर भारावून गेले.देशसेवा करून गावी तळेगाव ठाकुर मध्ये पोहचल्यावर संपूर्ण गाव भावुक झाल होत.जवानाच्या संपूर्ण गावचं नव्हे तर पंचक्रोशीतील नातेवाईक यांनी हजेरी लावली होती.यावेळी पूर्ण गाव सजून धजून उभ होत.सर्वात आनंद होता तो म्हणजे जवानाच्या कुटुंबाना... जवानाचे संपूर्ण कुटुंब आतुरतेने वाट पाहत होते.गोड भरवून त्यांचं औक्षण करण्यात आल.४० वर्षे देशसेवा करून सुखरूप गावी आल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत आहे.

# जिल्ह्यात १ हजार ४२३ गावे झाली ओडीएफ प्लस

## घनकचरा व्यवस्थापनामुळे साकार झाले उदिष्ट्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**



स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची कामे पूर्ण झालेल्या व हागणदरीमुक्त अधिक गावांबाबतचे निकष पूर्ण करणार्या जिल्ह्यातील १ - हजार ४२३ गावे आतापर्यंत हागणदरीमुक्त झाली आहेत. परिणामी, या गावांना 'ओडीएफ 'ओड प्लस'चा दर्जा मिळाला आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या - पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातर्फे - स्वच्छ भारत मिशन ग्रामीणच्या माध्यमातून कामे केली जात असून, - पहिल्या टप्यात गाव हागणदरीमुक्त करण्यावर भर दिला होता. यात प्रामुख्याने वैयक्तिक शौचालय बांधकामे केली. २०१९ मध्ये देश - हागणदरीमुक्त म्हणून घोषित केली. प्रत्येक गावामध्ये सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन करणे, सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम करणे यांसारखी कामे केली आहेत. ही कामे पूर्ण झाल्यावर त्या गावाला हागणदारीमुक्तचा दर्जा दिला जातो. जिल्ह्यात १ हजार ४२३ गावांनी उत्कृष्ट गावाचा दर्जा मिळाला आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाअंतर्गत ओडीएफ प्लस उपक्रमात सर्व ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी प्रयत्न केले आहेत. ओडीएफ प्लसमध्ये वैयक्तिक शौचालय बांधकाम व त्याचा वापर करणे, त्यांची शाश्वती राखणे, गावातील सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन अंगणवाडी, करणे, शाळा सर्व सार्वजनिक संस्थांमध्ये स्वच्छताविषयक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, गाव स्वच्छ ठेवणे आदी कामे केली. ही गावे ओडीएफ घोषित करण्यासाठी जि. प. सीईओ संजीता महापात्र, डेप्युटी सीईओ श्रीराम कुलकर्णी, बीडीओ, ग्रा.प. पदाधिकारी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**ही आहेत ओडीएफ प्लस गावे**

अचलपूर-११६, अमरावती-८७, अंजनगाव-९५, भातकुली-९१, चांदूर बाजार-१०७, चांदूर रेल्वे-७५, चिखलदरा-१४६, दर्यापूर- १२०, धामणगाव रेल्वे-७५, धारणी- १४६, मोर्शी-७७, नांदगाव खंडेश्वर-१२३, तिवसा-६८, वरुड-९०.

# प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वामुळे महिला उच्चपदावर : प्रविण पोटे पाटील

## प्रविण पोटे पाटील यांनी केले वूमन पावर प्रदर्शनीचे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**



भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी रंगोली मंगल कार्यालय येथे आयोजित महिलांच्या कलेला प्रोत्साहन देणाऱ्या वूमन पावर एक्स्पो चे उदघाटन केले.आज महिला सगळ्या कार्य क्षेत्रात त्यांच्या कर्तृत्वामुळे व मेहनतीमुळे उच्च पदावर आहेत त्या करत असलेल्या कार्यात त्यांना थोडी प्रेरणा दिली की त्यात त्यांना लवकर यश प्राप्त करता येते, जिद्द चिकाटीने काम केल्याने यश मिळवत जगामध्ये महिलांनी त्यांची एक ओळख निर्माण केली आहे. समाजातील प्रत्येक महिलेने स्वतःचे महत्त्व व कला कौशल्य ओळखत उदरनिर्वाह करिता बचत गटामार्फत नावीन्यपूर्ण उद्योग सुरू करावे त्यामुळे त्याची प्रगती होईल असे प्रतिपादन यावेळी भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले तसेच सर्व महिलांसोबत त्यांना प्रोत्साहन देत संवाद साधला यावेळी आयोजक पूनमताई पाटील, सुरेखाताई लुंगारे व मान्यवर उपस्थित होते.

# नजरअंदाज पैसेवारीनुसार दुष्काळसदृश स्थिती टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**



जिल्ह्यातील शेतीपिकांची स्थिती काहीशी चांगली आणि काहीशी खराब असल्याने अमरावती जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याचे सर्वसामान्य चित्र आहे. मात्र नजरअंदाज पैसेवारीच्या आकड्यांवरुन ही दुष्काळसदृश स्थिती टळली आहे.


जिल्हा प्रशासनाने आज, सोमवार ३० सप्टेंबरला उशीरा सायंकाळी जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यातील पैसेवारीचे आकडे घोषित केले. त्यानुसार नजरअंदाज पैसेवारी ६०.३५ टक्क्यांवर स्थिरावली आहे. सर्वाधिक ६८ टक्के पैसेवारी अमरावती तालुक्याची असून सर्वात कमी ५५ टक्के हा आकडा चांदूरबाजार तालुक्याचा आहे. या क्रमात नांदगाव खंडेश्वर आणि भातकुली ६४ टक्क्यांवर असून धामणगाव रेल्वे व तिवसा ६३, वरुड आणि दर्यापुर ६०, धारणी, मोर्शी आणि अचलपुर ५९, चांदूर रेल्वे ५८, अंजनगाव सुर्जी ५७ तर चिखलदरा तालुक्याची पैसेवारी ५६ टक्क्यांवर थांबली आहे.

महसूल विभागातर्फेदरवर्षी ३० सप्टेंबर रोजी नजरअंदाज पैसेवारीची घोषणा केली जाते. महसूल, ग्रामविकास (जिल्हा परिषद) आणि कृषी विभागाने केलेल्या संयुक्त सर्वेक्षणाअंती हे आकडे घोषित केले जातात. त्यानुसार जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या निर्देशानुसार उपजिल्हाधिकारी (महसूल) विवेक जाधव यांनी सोमवारी उशीरा सायंकाळी पैसेवारीची घोषणा केली. दरम्यान नोव्हेंबरअखेर सुधारित पैसेवारी तर डिसेंबरअखेर अंतिम ज पैसेवारीची घोषणा केली जाणार आहे.

# जिल्ह्यातील सर्वच प्रकल्पामध्ये मुबलक पाणी साठा उपलब्ध

## शेती आणि पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**




जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रात झालेल्या पावसाने मोठा प्रकल्प, मध्यम आणि लघु अशा ५६ प्रकल्पात जलसाठ्यात वाढ झाली असून, यातील काही प्रकल्प ओव्हरफ्लो होऊन वाहत असल्याने प्रशासनाने त्या प्रकल्पाचे दारे खुली केली आहेत. यामध्ये एक मोठा अप्पर वर्धा प्रकल्प तर सहा मध्यम प्रकल्पांचा समावेश आहे. आजघडीला ८८. ४५ टक्के जलसाठा आहे.

जिल्ह्यात यंदा होत असलेल्या संततधार पावसामुळे प्रकल्पातील पाणीसाठा कमालीचा वाढत आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याला तसेच शेतीला पूरक पाणी मिळेल. जिल्ह्यात पावसाची रिपरिप सुरू होती. काही भागात तीन दिवसापूर्वी पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे जलपातळीत आणखी वाढ आहे. त्यामुळे नदी नाल्यांसह मोठे प्रकल्प आणि मध्यम प्रकल्पांच्या जल पातळी वाढली आहे. सद्यास्थितीत ५६ प्रकल्पात उपयुक्त जलसाठा ८८. ४५ टक्के आहे.जिल्ह्यात सर्वात मोठा प्रकल्प असलेला अप्पर वर्धा धोरणाचा पाणीसाठा हा ९९.१८ टक्क्यांवर आहे तर ४८ लघु प्रकल्पात८३.५८ टक्क्यांवर जलसाठा आहे.

# स्वच्छता कंत्राटदारांनी दिला काम बंदचा इशारा : मनपा आयुक्तांनी मार्ग काढण्याचा दिला शब्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ अमरावती**



महानगर पालिकेची आर्थिक स्थिती खिळखिळी असून स्वच्छता, बांधकाम कंत्राटदारांची कामाची - देयके मागील काही महिन्यांपासून थकित आहेत. परिणामी कंत्राटदारांनाही त्यांच्या कर्मचार्यांना वेतन देता येत नाही. अशात त्यांनी ऐन नवरात्रोत्सव सुरू होण्याच्या आधी - मंगळवारी दि. १ ऑक्टोबरपासून - कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. यात भरीस भर म्हणून बांधकाम कंत्राटदारांनीही आंदोलनाचा इशारा देत मनपाची कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे.

निवेदनाद्वारे इशारा मिळताच पालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी स्वच्छता व बांधकाम कामगारांसोबत चर्चा करून त्यांना यातून मार्ग काढता येईल, असे समजावण्याचा प्रयत्न केला आहे. तिसरीकडे पालिका कर्मचारी संघानेही ८ ऑक्टोबरपासून सातव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळाली नाही तर बेमुदत काम बंदचा इशारा दिला आहे. महानगर पालिकेची आर्थिक स्थिती चांगली नाही असे असतानाही तत्कालीन आयुक्तांनी जे निर्णय घेतले त्याचा विपरित परिणाम सध्या मनपा प्रशासनाला सहन करावा लागत आहे. एकिकडे मालमत्ता कराची वसुली ठप्प असताना दुसरीकडे मनपावर कोट्यावधी रुपयांचे बिल थकित आहे. देयके देण्यासोबतच मनपा अधिकारी, कर्मचार्यांना वेतनही द्यावे लागते. या सर्वच बाबींचा विचार पालिका प्रशासनाला करावा लागत आहे.आम्ही सध्या सफाई व बांधकाम कंत्राटदारांसोबत चर्चा करून काही मार्ग निघतो काय, याबाबत विचार करीत आहोत. निश्चितपणे सकारात्मक मार्ग काढण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे पालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सांगितले.

# कोणत्याही कामात असा, आईबापाचा फोन कट करू नका : रविकांत तुपकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अकोला**

जगात आईवडिलांपेक्षा कुणीही मोठं नाही. अनेकदा आपण मीटिंगमध्ये किंवा कामात असतो, तेव्हाआईवडिलांचा आलेला फोन कट करतो. मात्र, असे करु नका. त्यांच्याशी बोला, कारण बाप नसतो तेव्हा कळते की बाप काय असतो ते, असे भावोद्गार शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी काढले. शंभुराजे प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या कमिटी हॉलमध्ये आयोजित रामकृष्ण अप्पा मिटकरी स्मृती विठोबा, ज्ञानोबा- तुकोबा, अभंग, पसायदान पुरस्कार वितरण व अभिवादन सोहळ्यात ते बोलत होते. रविकांत तुपकर यांना अभंग पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

# घटा-घटाचे रूप आगळे! आकर्षक घट बाजारात; खरेदी जोरात सुरू, फुले अन् फळांची आवक वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

शारदीय नवरात्रोत्सवात घरोघरी घटस्थापना होते. या उत्सवासाठी लागणाऱ्या घटांपासून पूजेच्या साहित्याची रेलचेल बाजारात दिसत आहे. घटस्थापनेसाठी आवश्यक असणारे घट अगदी ४० रुपयांपासून मिळत आहेत. त्यातही वैविध्य पाहायला मिळत असून, मातीचे साधे घट त्याचबरोबर नक्षीकाम करून सजविलेले आकर्षक घटही विक्रीसाठी उपलब्ध आहेत. पसंतीनुसार त्यांची खरेदी सुरू आहे.

काही ठिकाणी मातीचा, तर काही ठिकाणी, तांबे, पिळत, चांदी किंवा स्टील असा धातूचा घट बसवितात. घटस्थापनेच्या दिवशी ऐनवेळी धावपळ होऊ नये, म्हणून आधीपासूनच त्यानुसार घट, माती यांची खरेदी जोरात सुरू आहे. काही ठिकाणी सप्तधान्य, काही ठिकाणी पंचधान्य, तर काही ठिकाणी नुसते गहू मातीत टाकले जातात. आपल्या प्रथेनुसार धान्य पाखडून, निवडून ठेवण्यात महिला वर्ग मग्न आहे. काही ठिकाणी घटाची स्थापना होत नाही, पण अखंड नंदादीप लावला जातो. विड्याची पाने, आंब्याची पाने, फुले यांची आवक बाजारात वाढली आहे. नवरात्रोत्सवात घरोघरी



घटामध्ये देवीची स्थापना करून नंदादीप प्रज्वलित करून आदिमायेची नऊ दिवस मनोभावे पूजा केली जाते. या नऊ दिवसांत अनेक भाविक उपवासही करतात. त्यामुळे फळे, उपवासाचे पदार्थ, सुकामेवा यांनाही मोठी मागणी आहे.

**यासाठी बसविले जातात घट**

नवरात्रीतील नवदुर्गेच्या पूजेचा भाग म्हणून घटस्थापना केली जाते. घरात घट बसवला जातो. या घटस्थापनेचा संबंध थेट कृषी संस्कृती आणि शेतकऱ्यांशी असतो. घटस्थापना म्हणजे बीज परीक्षण. म्हणूनच यानिमित्त शेतात जी पिके पिकवली जातात, ज्यातून आपले पोट भरतेय, त्याप्रती श्रद्धा आणि कृतज्ञता व्यक्त केली जाते. घटस्थापनेला घटासमोर शेतातील माती आणली जाते.

**नक्षीकाम केलेले घट ठरताहेत लक्षवेधी**

१) यंदाही बाजारात लाल, काळ्या रंगाच्या घटांसोबत आकर्षक नक्षीकाम केलेले घट दिसून येत आहेत.

२) रंगीत लेस, आकर्षक खडे यांनी घट सजविले जात आहे. १५० ते २५०० रुपयांपर्यंत या घटांच्या सजावटीनुसार किमती आहेत. ग्राहक आवडीनुसार त्यांची खरेदी करत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

# अमरावतीत शिंदे गटाच्या नेत्याच्या कारवर गोळीबार

## राजकीय वर्तुळात खळबळ : थोडक्यात बचावले गोपाल अरबट







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि अमरावतीचे जिल्हा प्रमुख गोपाल अरबट यांच्या कारवर अज्ञातांनी गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वलगाव ते दर्यापूर मार्गावर सोमवारी (ता. ३०) मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली आहे. सुदैवाने या घटनेत गोपाल अरबट यांना कोणतीही दुखापत झाली नाही. मात्र, अज्ञातांनी त्यांच्या कारवर तीन गोळ्या धाडल्याचं समोर आलं आहे. या घटनेनं अमरावती जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरुण पडोळे यांच्या सांगण्यावरून माझ्या गाडीवर हल्ला झाला, असा आरोप शिंदे गटाचे गोपाल अरबट यांनी तक्रारीत केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोपाल अरबट हे सोमवारी रात्री वलगाव ते दर्यापूर मार्गावरुन कारने प्रवास करीत होते.यावेळी त्यांच्या इनोव्हा कारवर अज्ञात व्यक्तीने गोळीबार केला. आरोपींनी अरबट यांच्या कारवर एकापाठोपाठ एक तीन गोळ्या फायर केल्या. सुदैवाने या घटनेत अरबट यांना कोणतीही जीवितहानी झाली नाही. गोळीबारात गाडीच्या काचा फुटल्या. दरम्यान, आरडाओरड



होताच आरोपी घटनास्थळावरून फरार झाले.यानंतर अरबट यांनी तातडीने पोलिसांत धाव घेत गोळीबारा संदर्भात माहिती दिली. हा गोळीबार शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरुण पडोळे यांच्या सांगण्यावरून झाला आहे, असा आरोप गोपाल अरबट यांनी केला. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून घटनेचा तपास सुरु केला आहे.

शिंदे गटाच्या नेत्यावर गोळीबार झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मागील काही दिवसांपासून अमरावतीत शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख अरुण पडोळे आणि गोपाल अरबट यांच्यात वाद सुरू आहे. हा वाद दिवसेंदिवस टोकाला जात असल्याचं दिसून येत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे जून २०२४ मध्येही गोपाल अरबट आणि त्यांच्या मुलावर २० ते २५ जणांनी अचानक हल्ला केला होता. दर्यापूर ते अमरावती मार्गावरील प्रसाद मंगल कार्यालयाजवळ हा हल्ला झाला होता. या हल्ल्यात गोपाल अरबट हे जखमी झाले होते. अरुण पडोळे आणि त्यांच्या मुलगा राम पडोळे यांनी हा हल्ला केल्याचा आरोप अरबट यांनी केला होता. आता पुन्हा एकदा दोन्ही गटात वाद सुरु झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

### अरुण पडोळे म्हणतात प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी



गोपाल अरबट यांच्यावर झालेल्या गोळीबाराचा आणि माझा आणि माझ्या सहकाऱ्यांचा काहीही संबंध नाही, मी माझ्या पक्षाच्या कामासाठी काल रात्रीच मुंबईला निघालो होतो आणि मला आज सकाळी मुंबईला आल्यावर वृत्तपत्रातून हा गोळीबार झाल्याचा समजलं

हा जो गोळीबार झाला या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, पोलिसांनी तपास करून दूध का दूध पाणी का पाणी करावं,ज्यांनी हा गोळीबार केला असेल त्याच्यावर पोलिसांनी कठोर कारवाई करावी आसमंत आता अरुण पडोळे यांनी व्यक्तकेले.

# आमदार रवी राणांनी केलेले भूमिपूजन म्हणजे लबाडाचे आमंत्रण

## भाजप नेते तुषार भारतीय




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

बडनेरा मतदार संघात आता आमदार कडून भूमिपूजनाचा हैदोस सुरु आहे.३००० फलक लावणे तेवढेच नारळ फोडणे ,१० चुना पोते चुना आणि फटाके काही कार्यकर्ते गाडीत घेऊन फिरणे एका गाडीत ताशे वाजवणारे अशी वरात सध्या मतदार संघात फिरत आहे. हा हैदोस दर पाच वर्षांनी होत असल्याने टिंगल टवाळीचा विषय बनला असून मागील दहावर्षा पूर्वीचे काम झाली नसल्याने गेले ५ वर्ष झोपले होते का असा प्रश्न जनता विचारत आहे. जुन्या भूमिपूजनाचे कामाचे काय झाले ते कामे झाली नाही तसे आता होत असलेले भूमीपूजन म्हणजे लबाडाचे आमंत्रण आहे. ते काम होणारच नाही असे प्रतिपादन भाजपा नेते तुषार भारतीय यांनी आज कमल प्लाझा ते मंगल धाम कॉलनी या रस्त्याचे १०० लाख रुपयाच्या काँक्रीटीकरण भूमीपूजन कार्यक्रमात बोलत होते. या रस्त्यासाठी उपलब्ध निधीची व्यवस्था तुषार भारतीय यांनी केल्यावरही आमदार रवी राणा यांनी भूमीपूजन केल्याने हा वाद पेटला आहे. या अगोदर अनेक कामावर स्वतःचे फलक लाऊन श्रेय घेण्याचा प्रकारा मुळे भाजपा कार्यकर्ते आता अधिक आक्रमक झाली आहे. मी केलेल्या कामाचे भूमीपूजन चे काम आचार संहिता च्या अगोदर सुरु होईल या कामात आमदाराने लुडबुड करू नये. असा खणखणीत इशारा दिला.या मतदार संघातील मतदार आता कंटाळला असून आता बदल पाहीजे आहे.शाश्वत विकास पाहिजे आहे.तो करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहो असा विश्वास तुषार भारतीय यांनी दिला.या वेळी माजी उपमहापौर संध्याताई टिकले,सौ वंदनाताई हरणे,श्री चंद्रकांत खानझोड,श्री दादाराव काळे काका,प्रदीप ठाकरे, रश्मी ताई पाटील,मंदाताई कुळकर्णी ,मनीष पाटील ,नलिनी ताई कोरट उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन कुणाल टिकले यांनी केले.

# झुमकेवाले, राजा-राणी, बांधणी, एक वेगळा ट्विस्ट... यंदा नवरात्रीत दांडियाचे नवे रंग, नवे ढंग

## गुरुवारपासून नवरात्र उत्सवाला उधाण येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ मुंबई**

गुरुवारपासून नवरात्र उत्सवाला उधाण येणार आहे. भक्तिरसात नवरात्रीचा जागर न्हाऊन निघणार आहे. याबरोबरच नवरात्रीत सर्वांचे मोठे आकर्षण असते ते म्हणजे तरुणाईचे गरबानृत्य आणि दांडिया.

नवरात्रोत्सव आणखी उल्हासित करण्यासाठी, नाचतानाचे फेर धरण्यासाठी दांडिया सध्या बाजारात उपलब्ध आहेत. गरबा-दांडिया खेळताना कपडे आणि दागिन्यांप्रमाणे



फॅशनेबल दांडिया वापरण्याकडे तरुणाईचा कल आहे. हाच कल लक्षात घेऊन बाजारात अनेक प्रकारच्या दांडिया आल्या आहेत. ट्विस्ट दांडिया - स्टीलच्या दांडियामध्ये एक गोलाकार चक्र असते. त्यामुळे दोन्ही बाजूने दांडिया खेळू शकता. असे दांडिया लोकप्रिय आहेत, असे विक्रेते सुशांत सिंग यांनी सांगितले.

**दांडियातील विविधता-**

१) डिस्को दांडिया - डीजेच्या तालावर नाचण्यासाठी निऑन स्टिकचा वापर करतात. त्यांना आणखी मजबूत करून एलईडी स्टिक्स दांडिया बाजारात आले आहेत.

२) झुमकेवाले दांडिया - झुमके ही मुलींची आवडती गोष्ट आहे. रंगीबेरंगी आणि वर्कवाले झुमके दांडिया बाजारात उपलब्ध आहेत.

३) राजा-राणी दांडिया - राजस्थानमध्ये बाहुल्या प्रसिद्ध आहेत. त्या बाहुल्या मध्यभागी लावून दांडियाला अधिक आकर्षक बनवले जाते. तेही दांडिया उपलब्ध आहेत.

४) बांधणी दांडिया - पारंपरिक दांडियाला बांधणीचे कापड लावून या दांडिया तयार केल्या जातात. या दांडियाच्या खाली घुंगरूही असतात. या दांडियाचे वैशिष्ट्य म्हणजे यातली भन्नाट रंगसंगती.

# देशी गाय आता ‘राज्यमाता-गोमाता’; मंत्रिमंडळाचा निर्णय : लगेच आदेशही जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ मुंबई**

देशी गायींचे भारतीय संस्कृतीत वैदिक काळापासून असलेले स्थान आणि देशी गायींची एकूणच उपयुक्तता लक्षात घेऊन त्यांना यापुढे राज्यमाता-गोमाता असे म्हटले जाईल, असा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सोमवारी घेण्यात आला. लगेच त्या संबंधीचा शासन निर्णय (जीआर) राज्य सरकारने काढला.

गायींचे धार्मिक, वैज्ञानिक व आर्थिक महत्त्व विचारात घेऊन त्यांना



कामधेनू असे म्हटले जाते. राज्यातील विविध भागांत विविध प्रकारच्या देशी गायी आढळतात. मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी, पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी, विदर्भात गवळाऊ देशी गायी आहेत. राज्यातील सर्वच देशी गायींना राज्यमाता-गोमाता असे आता संबोधण्यात येणार आहे. प्रदेश भाजपने निर्णयाचे स्वागत केले आहे.

**का घेतला निर्णय?**

पशुसंवर्धन विभागाच्या निर्णयात म्हटले आहे, की गायींचे वैदिक काळापासून एक स्थान आहे.

या गायींच्या दुधाची मानवी आहारातील उपयुक्तता, आयुर्वेद चिकित्सा पद्धती, पंचगव्य उपचार पद्धती तसेच देशी गायींच्या शेण व गोमुत्राचे सेंद्रिय शेती पद्धतीत असलेले महत्त्वाचे स्थान विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

**गोशाळांना अनुदान**

गोशाळांमधील देशी गाईंच्या पालन पोषणासाठी प्रति दिवस प्रति गाय ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय मंत्रिमंडळांने घेतला. गोशाळांना अत्यल्प उत्पन्न असल्याने आर्थिक अडचणी येतात. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडून करण्यात येईल.

# पोराची हजेरी रजिस्टरवरच ॲपचे काय झाले गुरुजी?

## लॉगिन अपडेट होण्यास मोठ्या अडचणी : अनेकदा नेटवर्कचा अभाव



**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ अमरावती**

शिक्षण विभागाने १ डिसेंबर २०२३ रोजी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांतील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची हजेरी ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार स्विफ्टचॅट या ॲपवर विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्याच्या सूचना दिल्या आहेत. ऑनलाइन हजेरीमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीतील बोगसगिरीला आळा बसण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे.

विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाइन नोंदविण्याबाबतचे परिपत्रकाद्वारे आदेश दिले आहेत. त्यानुसार पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती वर्गशिक्षकांनी स्विफ्ट चॅट ॲप डाउनलोड करून त्या ॲपवरील अटेन्डन्स बॉटद्वारे ऑनलाइन नोंदवणे आवश्यक आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागानेगतवर्षी नोव्हेंबरमध्ये दिलेल्या आदेशानुसार शाळांमध्ये 'स्विफ्टचॅट' या ॲपवर विद्यार्थ्यांची ऑनलाइनहजेरी बंधनकारक करण्यात आली आहे; परंतु अनेक शाळांत विविध तांत्रिक अडचणींमुळे शिक्षकरजिस्टरवरच हजेरी घेत असल्याचे निदर्शनास येत आहे, तर मोजकेच ॲपवर हजेरी नोंदवीत आहेत.

### गुरुजींची अडचण काय?



जिल्ह्यातील शाळांमध्ये तांत्रिक अडचण येत आहे. यातच ग्रामीण व दुर्गम भागात नेटवर्कचा मोठा अभाव आहे. याशिवाय हजेरी घेण्यासाठी शिक्षकांना स्वतःचा मोबाइल वापरायचा आहे. त्यामुळे रिचार्जचा खर्च कोण देणार, अशा प्रकारच्या विविध अडचणी आहेत. अगोदरच अनेक प्रकारची माहिती ऑनलाइन माध्यमातून भरावी लागत आहे. यामध्ये मोठा वेळ जातो. त्यात आता विद्यार्थ्यांची हजेरी नोंदविण्याचे कामही ॲपच्या मदतीने करावे लागणार असल्याने शिक्षकांमधून याला विरोध आहे. यामुळे स्विफ्टचेंट हजेरी नोंदविली जात नाही.

**राजेश सावरकर**

# महाराष्ट्राचे सहा आमदार पाचवी पास, फक्त १०वी शिकलेले ४४

## पहा मतदारांनी निवडलेल्या नेत्यांचे शिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ नवी मुंबई**

महाराष्ट्रातील २८८ पैकी १७६ आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. टक्केवारीत ही संख्या ६२ टक्के इतकी प्रचंड आहे. यात गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आमदारांची संख्या ११३ अर्थात ४० टक्के इतकी आहे. गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आमदारांमध्ये दोघांवर खुनाचा तर ११ जणांवर खुनाचा प्रयत्न केल्याचे गुन्हे दाखल आहेत. तर चौघांवर अपहरणाचे गुन्हे दाखल आहेत.

विधानसभेच्या २०१९च्या निवडणुकीत इलेक्शन वॉच आणि असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर) यांनी केलेल्या विश्लेषणातून ही माहिती पुढे आली आहे. गुन्हे दाखल असलेल्या आमदारांमध्ये भाजपचे १०५ पैकी ६५ आमदार असून, ४० आमदारांवर गंभीर गुन्हे नोंद आहेत. शिवसेनेच्या ५५ पैकी ३१ आमदारांवर गुन्हे नोंद असून, २६ जणांवर गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. राष्ट्रवादीच्या ५३ पैकी ३२ आमदारांवर विविध गुन्हे असून, १७ जणांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत.

**शिक्षणनिहाय आमदारांची संख्या**

| | |
|---|---|
| शिक्षित | ४ |
| पाचवी पास | ६ |
| आठवी पास | १३ |
| दहावी पास | ४४ |
| १२ वी पास | ५४ |
| पदवीधर | ७२ |
| इतर पदवीधारक | ५१ |
| पदव्युत्तर | ३५ |
| डॉक्टरेट | ६ |



काँग्रेसच्या ४४ पैकी २६ जणांवर गुन्हे नोंद असले तरी १५ जणांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत. १२ अपक्षांपैकी ९ जणांवर विविध गुन्हे दाखल असून, यापैकी ६ जणांवर गंभीर गुन्हे नोंद असल्याचे अहवालात म्हटले आहे.

**राज्यातील ६ आमदार डॉक्टरेट, तर १९ जण पाचवी ते आठवी पास**

विधानसभेच्या २०१९च्या निवडणुकीत इलेक्शन वॉच आणि असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर) यांनी केलेल्या विश्लेषणानुसार महाराष्ट्रातील २८८ पैकी २८५ आमदार शिक्षित आहेत. यात सहा जण डॉक्टरेट असून, ७२ जण पदवीधर तर १९ आमदार पाचवी ते आठवी पास आहेत. तिघांच्या अर्जाचे विश्लेषण केलेले नाही.

विधानसभेच्या २०१९च्या निवडणुकीत सर्वपक्षीय आमदारांनी सादर केलेल्या शपथपत्रांच्या आधारे एडीआरने हे विश्लेषण केले आहे.